दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७ | रविवार दि. ०५ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### अवकाळी थैमान : कष्टावर

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीच्या तडाख्याने शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. ऐन कापणीच्या आणि तोडणीच्या हंगामात निसर्गाने घेतलेल्या या पलटीमुळे बळिराजाच्या हातातोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावला गेला आहे. द्राक्ष, केळी, आंबा यांसारख्या फळबागांसह गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा या रबी पिकांचे झालेले मोठे नुकसान केवळ शेतीपुरते मर्यादित नसून त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थचक्रावर होणार आहेत.

# एचटीबीटी कापूस बियाण्यांपासून सावध!

## बेकायदेशीर वापर केल्यास ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास; कृषी विभागाचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

खरीप हंगामाची तयारी वेगाने सुरू असताना कृषी विभागाने शेतकऱ्यांना महत्त्वाचा इशारा देत बेकायदेशीर कापूस बियाण्यांच्या वापरापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः बीजी-३ (एचटीबीटी) कापूस बियाण्यांचा वापर टाळावा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास पाच वर्षांपर्यंत कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असल्याने शेतकऱ्यांनी विशेष दक्षता बाळगावी, असे प्रशासनाने सांगितले आहे.



कृषी विभागाच्या माहितीनुसार, सध्या शासनाने केवळ बीजी-१ आणि बीजी-२ (बोलगार्ड-२) या कापूस वाणांनाच अधिकृत मान्यता दिली आहे. मात्र, बाजारात 'राउंडअप बीटी', 'चोर बीटी', 'वीडगार्ड' किंवा एचटीबीटी नावाने बियाण्यांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही सर्व बियाणे पूर्णपणे बेकायदेशीर असून त्यांचा पर्यावरण आणि शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे. अशा बेकायदेशीर बियाण्यांची विक्री प्रामुख्याने विनापावती आणि जादा दराने केली जाते. या पॅकेटवर बियाण्यांची गुणवत्ता, तंत्रज्ञान, उत्पादन क्षेत्र किंवा कंपनीची अधिकृत माहिती ◀◀ पान २ वर

### बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी

शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. बियाणे केवळ परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावेत. खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. बिलावर पीक, वाण, लॉट क्रमांक आणि कंपनीचे नाव तपासावे. बियाण्यांचे पॅकेट पूर्णपणे सीलबंद असल्याची खात्री करावी. पॅकेटवरील उगवणीची अंतिम मुदत तपासावी. अधिकृत शासनमान्य चिन्ह असल्याची खात्री करावी.

## थोडक्यात...

### कार कालव्यात बुडाली; ३ ठार

पंढरपूर : नाशकात कार विहिरीत पडल्याने मोठा अपघात झाला, त्या अपघातात ९ जण ठार झाले, ही घटना ताजी असतानाच इर्टिका कार कालव्यात पडल्याने ३ जणांचा मृत्यू झाला. ही घटना पंढरपूरच्या नातेपुते-निरा उजव्या कालव्यादरम्यान घडली. पंढरपूरच्या नातेपुतेजवळ नीरा उजवा कालव्याच्या पुलावरून एक इर्टिका गाडी अचानक कालव्यात पडली. ही कार मुंबईवरून फोंडशिरसकडे जात असताना थेट कालव्यात पडली आणि मोठा अपघात झाला. या घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, त्यांना वाचवण्यात यश मिळाले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, गाडीत असलेल्या तीन जणांचा मृत्यू झाला. गाडी कालव्यात पडल्यानंतर तिघेही गाडीतच अडकले होते. पाटबंधारे खात्याचे शाखाअधिकारी घटनास्थळी पहाटेपासून हजर झाले. यासोबतच अनेक अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले.

### राघव चड्ढांचे जोरदार प्रत्युत्तर

दिल्ली : आम आदमी पक्ष आणि पक्षाचे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांच्यातील वाद शनिवारी विकोपाला गेला. गेल्या काही दिवसांपासून पक्षातून बाजूला सारले गेलेले चड्ढा यांनी पक्षाने केलेले सर्व आरोप खोटेपणा असल्याचे सांगत फेटाळून लावले आहेत. मी संसदेत गोंधळ घालण्यासाठी नाही, तर जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी जातो, अशा शब्दांत त्यांनी आपला बचाव केला. आम आदमी पक्षाने गुरुवारी चड्ढा यांची राज्यसभेतील उपनेतेपदावरून हकालपट्टी केल्यानंतर हा संघर्ष अधिक तीव्र झाला. पक्षाने त्यांच्यावर असा आरोप केला होता की, चड्ढा संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेण्याऐवजी केवळ स्वतःचे सॉफ्ट पीआर करण्यात मग्न असतात. यावर प्रत्युत्तर देताना चड्ढा यांनी एका व्हिडिओ निवेदनात धुरंधर चित्रपटातील संवाद उद्धृत केला. माझ्यावर जाणीवपूर्वक चिखलफेक केली जात आहे. पण लक्षात ठेवा, मी घायाळ आहे, म्हणूनच मी घातक आहे (क्योंकि मैं घायल हूँ, इसलिए घातक हूँ), असे चड्ढा म्हणाले.

### काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या ताफ्यावर हल्ला

मलप्पुरम : केरळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचारासाठी निघालेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि खासदार शशी थरूर यांच्या ताफ्यावर हल्ला झाला. या घटनेत थरूर यांचे वैयक्तिक सुरक्षा रक्षक आणि चालक जखमी झाले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेतले असून, उर्वरित चौघांचा शोध सुरू आहे. ही घटना मलप्पुरम जिल्ह्यातील वंडूर येथील थिरुवली नजीकच्या चेल्लीथोड पुलावर शुक्रवारी रात्री घडली. शशी थरूर हे काँग्रेसचे उमेदवार ए. पी. अनिलकुमार यांच्या निवडणूक प्रचारासाठी जात होते. पुलाजवळ अरुंद रस्ता असल्याने तिथे मोठी वाहतूक कोंडी झाली होती. दरम्यान, दोन वाहनांनी थरूर यांच्या गाडीला अडवले. गाडीचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न करत असताना तिथे उपस्थित असलेल्या पाच जणांच्या टोळक्याने थरूर यांच्या सुरक्षा रक्षकांवर आणि चालक सतीश के. पी. यांच्यावर अचानक हल्ला केला.

# इंधन टंचाईची भीती निराधार

## देशात पुरेसा साठा; केंद्र सरकारचे नागरिकांना आवाहन




**दिल्ली । प्रतिनिधी**

जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर विशेषतः होर्मुज सामुद्रधुनी बंद होण्याच्या शक्यतेमुळे देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या उपलब्धतेबाबत चिंता व्यक्त होत असताना केंद्र सरकारने नागरिकांना महत्त्वाचे आश्वासन दिले आहे. देशात इंधनाचा पुरवठा मुबलक असून घाबरून खरेदी करण्याची कोणतीही गरज नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

अमेरिका-इराण तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाली असली, तरी भारतातील इंधन पुरवठ्यावर त्याचा कोणताही तात्काळ परिणाम झालेला नाही. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या माहितीनुसार, देशातील सर्व रिफायनऱ्या पुरेशा कच्च्या तेलाच्या साठ्यासह कार्यरत आहेत. पेट्रोल पंपांवरही इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती वापरासाठी एलपीजी आणि पाइप्ड नॅचरल गॅसला प्राधान्य देण्यात आले असून ◀◀ पान २ वर

# केंद्रीय निवडणूक आयोगाकडून राष्ट्रावादीच्या नव्या ठरावांना मान्यता

## राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार, पार्थही खासदार

**दिल्ली । वृत्तसेवा**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत रचनेत गेल्या दोन महिन्यांत मोठे फेरबदल झाले असून, आता पक्षाची धुरा अधिकृतपणे सुनेत्रा पवार यांच्या हाती आली आहे. १६ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ दरम्यान घडलेल्या वेगवान घडामोडींनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने पक्षाच्या नव्या ठरावांना आणि कार्यकारिणीला मान्यता दिली आहे. यामुळे सुनेत्रा पवार यांची अध्यक्ष म्हणून आणि पार्थ पवार यांची खासदारकी



कायदेशीररित्या भक्कम झाली आहे.

पक्षातील बदलांची सुरुवात १६ फेब्रुवारी २०२६ रोजी झाली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या दिवशी निवडणूक आयोगाला एक नवी पक्षाघटना सादर करण्यात आली होती. यामध्ये कार्याध्यक्ष (प्रफुल्ल पटेल) यांना राष्ट्रीय ◀◀ पान २ वर

# तिहेरी हत्याकांडाने नांदेड हादरले, गँगवॉरमधून घडला थरार

**नांदेड । प्रतिनिधी**


गँगवॉरमधील वर्चस्वातून नांदेड शहरात तिहेरी हत्याकांडाची घटना शनिवारी पहाटे घडली. यात एकाची निळा रोडलगतच्या कॅनल रोडवरील ई-स्क्वेअर परिसरात हत्या करण्यात आली तर 'खून का बदला खून' असे म्हणत या मयत तरुणाच्या भावाने दोघांची शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असतानाच चाकूने वार करून हत्या केली. या घटनेमुळे नांदेड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार नांदेड शहरालगतच्या कॅनल रोडवरील ई-स्क्वेअर परिसरात शुक्रवारी रात्री सय्यद आवेश सय्यद खलील आणि घनश्याम रेड्डी, मोहम्मद अरबाज यांच्यासह इतर अज्ञात आरोपींनी अर्जितसिंग चव्हाण यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला तर जखमी झालेल्या सय्यद अवेज व आणखी एका युवकास पोलिसांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी ◀◀ पान २ वर

# माहूरगडावरील महंत मधुसूदन भारती महाराजांचे निधन

**नांदेड । प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र माहूरगडावरच्या दत्त मंदिराचे



महंत मधुसूदन भारती महाराज यांना शनिवारी देवाज्ञा झाली, ते गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांचे वय ९९ वर्षे असल्याचे सांगण्यात आले. आज रविवारी दुपारी तीन वाजता ◀◀ पान २ वर

# निवडणूक आयोग, कॅग राजकीय प्रभावापासून मुक्तच हवे : न्या. नागरत्ना

**पाटणा । प्रतिनिधी**

लोकशाही शासनाची अखंडता जपण्यासाठी भारताचा निवडणूक आयोग आणि नियंत्रक व महालेखा परीक्षक (कॅग) यांसारख्या घटनात्मक संस्थांनी स्वतंत्रपणे काम केले पाहिजे आणि राजकीय प्रभावापासून अलिप्त राहिले पाहिजे, अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी शनिवारी (दि. ४ एप्रिल) व्यक्त केली. पाटणा येथील चाणक्य राष्ट्रीय विधी विद्यापीठात डॉ. राजेंद्र प्रसाद स्मृती व्याख्यानात ''हक्कांच्या पलीकडील संविधानवाद: संरचनेचे महत्त्व का आहे?'' या विषयावर बोलताना न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी घटनात्मक संस्थांचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, भारतीय राज्यघटनेत काही महत्त्वाच्या कामांसाठी खास संस्था (उदा. निवडणूक आयोग, कॅग) बनवल्या आहेत. जिथे सामान्य राजकारणामुळे निष्पक्षपातीपणा राहीलच याची खात्री देता येत नाही, तिथे या संस्था काम करतात. त्यामुळे, लोकशाही जपण्यासाठी या संस्थांनी कोणत्याही राजकीय दबावाशिवाय, पूर्णपणे स्वतंत्रपणे काम करणे अत्यंत गरजेचे आहे.

# अखेर अंजनगावातील पुतळ्याचा वाद मिटला!

**पंढरपूर । प्रतिनिधी**

माढा तालुक्यातील अंजनगाव खेलोबा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा जागेचा अखेर तोडगा निघाला. त्यामुळे सलग तीन दिवसानंतर चौथ्या दिवशी अंजनगावात असणारा तणाव निवळला जाणार आहे. तर या निर्णयामुळे लक्ष्मण हाके यांचे आंदोलन यशस्वी ठरले गेले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा असणारी जागा खेलोबा देवस्थानची असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे या



लक्ष्मण हाकेंचे आंदोलन यशस्वी

जागेवरून पुतळा गावातील दुसऱ्या सरकारी जागेत स्थलांतरित करण्याचा निर्णय मोहोळ येथील बैठकीत करण्यात आला. या बैठकीसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कार्तिकेयन, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राजन पाटील यांच्यासह स्थानिक मराठा आणि धनगर समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी ◀◀ पान २ वर

# सर्वच पक्षांनी बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करावी

**नागपूर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वच पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देत ही निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री फडणवीस शनिवारी नागपूरात होते, यावेळी त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनीी हे आवाहन केले.



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आता बारामती विधानसभेची पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीत सुनेत्रा पवार या महायुतीच्या उमेदवार आहेत. या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देणार असल्याचे मातोश्रीवरून शिक्कामोर्तब ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.३० मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५६.०० क्विंटल | १,९२३ | २,६०१ | २,२४४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६१.५० क्विंटल | १,७०० | ४,२०० | ३,२१७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी:५५.०० क्विंटल | २,४०० | २,७५० | २,६३९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ४,९०० | ५,०५० | ४,९९८ |

# 'युद्धा'च्या मुद्द्यावर काँग्रेसमध्ये दोन गट?

## राहुल गांधींच्या भूमिकेच्या उलट ४ ज्येष्ठ नेत्यांकडून सरकारचे कौतुक

**दिल्ली । वृत्तसंस्था**

परराष्ट्र धोरण आणि ऊर्जा सुरक्षेच्या मुद्द्यावर काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद असल्याचे या विधानांवरून स्पष्ट होत आहे. जिथे राहुल गांधी सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत, तिथेच अनुभवी नेते सरकारच्या पाठीशी उभे राहिलेले दिसत आहेत.

मध्य-पूर्व आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षामध्ये मतमतांतरे पाहायला मिळत आहेत. एकीकडे राहुल गांधी




या मुद्द्यावरून केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट हल्ला चढवत असताना, दुसरीकडे पक्षाचे चार दिग्गज नेते मात्र सरकारच्या परराष्ट्र धोरणाचे समर्थन करताना दिसत आहेत. कमलनाथ, आनंद शर्मा, शशी थरूर आणि मनीष तिवारी यांनी या संवेदनशील विषयावर राहुल गांधींपेक्षा वेगळी आणि सकारात्मक भूमिका मांडली आहे. काँग्रेसच्या या वरिष्ठ नेत्यांनी भारताच्या सध्याच्या परराष्ट्र धोरणाला 'परिपक्व' म्हटले आहे. माजी केंद्रीय मंत्री आनंद शर्मा यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारच्या राजनैतिक पद्धतीची प्रशंसा केली. ते म्हणाले की, ''अनपेक्षित आणि अस्थिर परिस्थितीत सरकारने घेतलेले निर्णय समजूतदारपणाचे होते, ज्यामुळे संभाव्य धोके टळले आहेत. अशा वेळी राष्ट्रीय हित लक्षात घेऊन सर्वांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. काँग्रेस खासदार मनीष तिवारी यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले की, पश्चिम आशियातील युद्धाच्या संदर्भात सरकार कदाचित योग्य पावले उचलत आहे.

# हॉर्मुझतून सर्वाधिक जहाजे पाठवणाऱ्या देशांमध्ये भारताचा समावेश

नवी दिल्ली । वृत्तसेवा

हॉर्मुझतून सामुद्रधुनीतील नाकेबंदी असूनही, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्वाधिक जहाजांच्या बाबतीत भारत एक प्रमुख देश म्हणून समोर आला आहे. संघर्ष सुरू झाल्यापासून किमान आठ भारतीय जहाजांनी हॉर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीपणे पार केली आहे.

२८ फेब्रुवारी रोजी झालेल्या अमेरिका-इस्रायल हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपली पकड घट्ट केली आहे. यामुळे जागतिक इंधन पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले असून ऊर्जा बाजारात खळबळ उडाली आहे. आकडेवारीनुसार, या महत्त्वाच्या जलमार्गावरून जाणाऱ्या मालवाहू जहाजांपैकी ६० टक्के जहाजे



एकतर इराणमधून आली होती किंवा इराणच्या दिशेने जात होती.मात्र, ही नाकेबंदी असतानाही भारताने या मार्गाचा प्रभावी वापर केला आहे. युद्धजन्य परिस्थिती असतानाही भारताची किमान आठ जहाजे या भागातून सुरक्षितपणे बाहेर पडली आहेत. यामध्ये दोन एलपीजी वाहक जहाजांचा समावेश असून, त्यांनी सुमारे ९४,००० टन एलपीजी कार्गोची सुरक्षित वाहतूक केली.

अग्रलेख

# अवकाळी थैमान : कष्टावर पाणी शेतकरी हवालदिल

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीच्या तडाख्याने शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. ऐन कापणीच्या आणि तोडणीच्या हंगामात निसर्गाने घेतलेल्या या पलटीमुळे बळिराजाच्या हातातोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावला गेला आहे. द्राक्ष, केळी, आंबा यांसारख्या फळबागांसह गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा या रबी पिकांचे झालेले मोठे नुकसान केवळ शेतीपुरते मर्यादित नसून त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थचक्रावर होणार आहेत.

सांगली, सोलापूर, फलटण, सांगोला, बारामती, इंदापूर या द्राक्षपट्ट्यांमध्ये गारपिटीने अक्षरशः थैमान घातले. तोडणीच्या उंबरठ्यावर असलेल्या द्राक्षबागांमधील मण्यांना तडे जाऊन मालाचा दर्जा घसरला. निर्यातक्षम द्राक्षांचे नुकसान झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी हुकल्या आणि स्थानिक बाजारात दर कोसळले. कष्टाने पिकवलेला माल कवडीमोल दराने विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. जळगाव परिसरात वादळी वाऱ्याने केळीच्या बागा जमीनदोस्त केल्या, तर मराठवाड्यात आंबा बागांना मोठा फटका बसून उत्पादनात ५० ते ६० टक्क्यांची घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.या संकटाची व्याप्ती केवळ फळबागांपुरती मर्यादित नाही. गहू, हरभरा, ज्वारी यांसारखी काढणीला आलेली पिके आडवी पडली आहेत. कांदा आणि भाजीपाला पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील सुमारे १.२२ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली आहेत. ही आकडेवारी केवळ संख्या नसून हजारो शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या स्वप्नांची साक्ष आहे. निसर्गाच्या या लहरीपणामागे हवामान बदलाचे वाढते संकट स्पष्ट दिसते. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार अरबी समुद्रातून येणारे बाष्पयुक्त वारे आणि स्थानिक कमी दाबाचे पट्टे यामुळे राज्यात अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. यामुळेच अवकाळी पावसाचे प्रमाण वाढत असून त्याची तीव्रताही अधिक होत आहे. ही केवळ एक तात्पुरती आपत्ती नसून भविष्यात अधिक गंभीर स्वरूप धारण करू शकणारा इशारा आहे.शासनाने परिस्थितीची दखल घेत पंचनामे करण्याचे आणि मदत देण्याचे आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्षात मदतीचा वेग आणि पारदर्शकता यावरच शेतकऱ्यांचा विश्वास टिकून आहे. अनेकदा अशा आपत्तीनंतर मदत उशिरा मिळते किंवा ती अपुरी ठरते, हा अनुभव शेतकऱ्यांनी वारंवार घेतला आहे. त्यामुळे यावेळी तातडीने, पुरेशी आणि थेट मदत देणे अत्यंत आवश्यक आहे. विमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पीकनुकसान भरपाईचे योग्य मूल्यांकन आणि कर्जमाफीसारख्या उपाययोजना तातडीने राबवणे गरजेचे आहे. यासोबतच दीर्घकालीन उपाययोजनांवरही भर देणे तितकेच महत्त्वाचे आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती पद्धती, हवामानानुसार पीकपद्धतीत बदल, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि जलव्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. फळबागांसाठी संरक्षक जाळ्या, हरितगृह शेती, तसेच हवामान पूर्वसूचना प्रणाली अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे.

अवकाळी पावसाचा हा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा आहे. शेतकरी अडचणीत सापडला तर त्याचा परिणाम बाजारपेठ, रोजगार आणि अन्नपुरवठ्यावर होतो. त्यामुळे या संकटाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून न पाहता व्यापक आर्थिक आणि सामाजिक संकट म्हणून पाहणे गरजेचे आहे.आज बळिराजा पुन्हा एकदा संकटात उभा आहे. त्याच्या डोळ्यांतील आशा आणि कष्टांचे चीज होण्याची अपेक्षा या अवकाळी पावसाने धुळीस मिळवली आहे. अशा वेळी शासन, प्रशासन आणि समाजाने एकजुटीने पुढे येऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच खरी काळाची गरज आहे. नाहीतर ''शेतकरी वाचला तर देश वाचेल'' ही घोषणा केवळ घोषणाच राहण्याचा धोका आहे.

# कार्यकर्त्यांनी लोकांचा विश्वास संपादन करावा -आ. अर्जुनराव खोतकर

## मतदार यादी पुनर्विलोकन करताना कार्यकर्त्यांनी खबरदारी घ्यावी -भास्कर आंबेकर

मंठा । प्रतिनिधी

गाव पातळीवर कार्यकर्त्यांनी निष्ठेने काम करून लोकांचा विश्वास संपादन केल्यास स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत शिवसेनेचा भगवा निश्चित फडकणार असा विश्वास आ. अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केला. मंठा येथे परतुर - मंठा - नेर - सेवली विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



येथील विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालयात शनिवार ता. ४ रोजी आयोजित मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून परभणी लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, जालना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे, बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, माजी सभापती तथा संचालक संतोष वरकड, हरिभाऊ चव्हाण, मंठा तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, परतुर तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, जालना तालुकाप्रमुख हरिभाऊ पोहेकर, जालना ग्रामीण तालुकाप्रमुख अरुण उफाड, श्रीरंगराव खरात, योगेश पाटील अवचार, नगरसेवक अचित बोराडे, महिला आघाडीच्या शिरगुळेताई, वसंतराव राऊत, तुळशीराम कोहिरे यांची उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर कै. आनंद दिघे, शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना अर्जुनराव खोतकर म्हणाले की, जिल्हाप्रमुख ए जे पाटील बोराडे हे मतदार संघातील सर्व कार्यकर्त्यांसाठी अहोरात्र झटणारा कार्यकर्ता असून जनतेच्या कामाविषयी असलेली तळमळ त्यांच्यात नेहमीच दिसून येते, असे सांगतानाच कार्यकर्त्यांनी गाव पातळीवर चांगले काम करा, निष्ठेने काम करा, पक्षाचे भविष्य उज्वल आहे. हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे आणि पक्षप्रमुख, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे असे सांगितले.

गावपातळीवर कार्यकर्त्यांनी जबाबदारीने काम करावे-बोराडे

गावपातळीवरील कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार यादी पुनर्विलोकन काळजीपूर्वक करावी, बूथ प्रमुखांनी जबाबदारीने काम करावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांनी केले यावेळी भास्करराव आंबेकर म्हणाले की, सध्या मतदार याद्या पुनर्विलोकन सुरू असून पक्षाच्या बीएलए यांनी शासनाच्या बीएलओ सोबत संपर्क ठेवून दुबार नावे कमी करणे, चुकीची नावे कमी करणे ही कामे जबाबदारीने पूर्ण करावी असे आवाहन केले. यावेळी जालना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर म्हणाले की, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत, ग्रामपंचायत या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी मध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे असे आवाहन केले. यावेळी हरिभाऊ चव्हाण, किसनराव मोरे, अरुण उफाड यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी भीमराव राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला तसेच युवासेना तालुकाप्रमुख चैतन्य ठोंबरे, विधानसभा अध्यक्ष सचिन सोळंके, विधानसभा समन्वयक रितेश सोळंके यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या बैठकीला अशोक भागडे, बाबाराव राठोड, योगेश गणगे, रामराव वरकड, भगवान गायकवाड, अक्षयदीप वाघमारे, पांडुरंग बोराडे, बबन शेळके, डॉ. उद्धव उबाळे, विजय बागल, अशोक मुरकुटे, प्रदीप ठोके, अशोक सोळंके, रामजी खवल, शरद भारुका, विलास लिपणे, मारुती धुमाळ, विजय ठोंबरे, गोरखनाथ वटाने, नितीन राठोड यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेनेचे शहर संघटक पप्पू दायमा यांनी केले.

पान १ वरून...

### एचटीबीटी कापूस

दिलेली नसते. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होण्याचा धोका अधिक वाढतो. काही वेळा या बियाण्यांमुळे अपेक्षित उत्पादन मिळत नाही, परिणामी शेतकऱ्यांना मोठ्या तोट्याला सामोरे जावे लागते. कृषी विभागाने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारची बेकायदेशीर विक्री किंवा लागवड आढळल्यास त्वरित संबंधित कृषी अधिकाऱ्यांना माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, अशी खात्री प्रशासनाने दिली आहे. यामुळे अशा गैरप्रकारांवर आळा घालण्यास मदत होणार आहे. दरम्यान, बीजी-२ (बोलगार्ड-२) वाणाची सध्याची किंमत सुमारे ९०१ रुपये असल्याची माहिती देण्यात आली असून सर्व अधिकृत वाणांमध्ये तंत्रज्ञान समान असल्याने कोणत्याही विशिष्ट ब्रँडचा आग्रह धरण्याची आवश्यकता नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच पूर्व हंगामी लागवड टाळण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. शेवटी, बेकायदेशीर एचटीबीटी बियाण्यांच्या मोहाला बळी न पडता केवळ अधिकृत आणि प्रमाणित बियाण्यांचा वापर केल्यासच शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळता येईल आणि कायदेशीर अडचणींपासूनही बचाव होईल, असा पुनरुच्चार कृषी विभागाने केला आहे.

### केंद्रीय निवडणूक आयोगाकडून

अध्यक्षांच्या समकक्ष अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, निवडणूक आयोगाने ही नवी घटना स्वीकारली नाही किंवा तिला मान्यताही दिली नाही. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईतील वरळी येथे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात अत्यंत महत्त्वाचे दोन निर्णय घेण्यात आले. सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर पक्षाच्या मूळ घटनेत बदल करून कार्यकारिणीची मुदत तीन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढवण्यात आली. १ मार्च २०२६ रोजी प्रफुल्ल पटेल यांचे विश्वासू ब्रिजमोहन यांनी ईमेलद्वारे आयोगाला माहिती देण्याचा प्रयत्न केला. यात सुनेत्रा पवार अध्यक्ष आणि प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष असल्याचा उल्लेख होता. मात्र, या पत्रासोबत अधिवेशनातील अधिकृत ठराव किंवा आमदार-खासदारांच्या सह्या नसल्याने आयोगाने त्याकडे दुर्लक्ष केले. विशेष म्हणजे, २६ फेब्रुवारीच्या नव्या कार्यकारिणीत ब्रिजमोहन यांचा समावेश नव्हता. शेवटी १० मार्च २०२६ रोजी वरळी अधिवेशनातील अधिकृत ठराव आयोगाकडे पाठवण्यात आले. यामध्ये सुनेत्रा पवार - राष्ट्रीय अध्यक्ष, शिवाजीराव गर्जे - खजिनदार, कार्यकारिणीत पटेल, तटकरे, भुजबळ यांच्यासह १४ जणांचा समावेश करण्यात आला. (परंतु त्यांच्या विशिष्ट पदांचा उल्लेख करण्यात आलेला नाही). ११ मार्च २०२६ रोजी पाच राज्यांच्या निवडणुकीत घड्याळ चिन्ह आरक्षित करण्याबाबत पुन्हा पत्रव्यवहार झाला. आयोगाच्या अभिलेखावर अधिकृत प्रतिनिधी म्हणून शिवाजीराव गर्जे यांचे नाव असल्याने, आयोगाने त्यांच्याशी संपर्क साधून अधिकृत पत्रव्यवहार पूर्ण केला.

### इंधन टंचाईची भीती

रुग्णालये, अत्यावश्यक सेवा आणि सामान्य नागरिकांचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. एका दिवसात तब्बल ५१ लाख एलपीजी सिलेंडरचे वितरण करण्यात आले असून त्यापैकी ९५ टक्के बुकिंग ऑनलाइन माध्यमातून झाल्याची माहिती सरकारने दिली आहे. दरम्यान, इंधन आणि गॅसची कृत्रिम टंचाई निर्माण करून नफेखोरी करणाऱ्यांवर सरकारने कठोर कारवाई सुरू केली आहे. देशभरात ३,७०० हून अधिक छापे टाकण्यात आले असून सुमारे १,००० नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच नियमभंग करणाऱ्या २७ डीलरचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. केंद्र सरकारने नागरिकांना स्पष्ट संदेश देताना सांगितले आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि पॅनिक बायिंग टाळावी. जागतिक स्तरावर तणाव असला तरी भारतात इंधनाचा पुरवठा स्थिर आणि सुरळीत असल्याने कोणतीही घबराट करण्याची आवश्यकता नाही.

### तिहेरी हत्याकांडाने नांदेड

दाखल केले. यानंतर शनिवारी पहाटेच्या सुमारास मयत अर्जित सिंगच्या भावाने 'खून का बदला खून' असे म्हणत रुग्णालयात जाऊन जखमी सय्यद अवेस व मोहम्मद अरबाज या दोघांवर चाकूने हल्ला केला. यात दोघांचाही जागेवरच मृत्यू झाला. सदर घटना गँगवॉरमधून वर्चस्व गाजवण्याच्या वादामधून झाली असल्याची चर्चा होत आहे. या हल्ल्यात हल्लेखोरांची संख्या जास्त असल्याची शक्यता असून त्या अनुषंगाने पोलिस शोध घेत आहेत.

### सर्वच पक्षांनी बारामतीची

करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वच पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देत ही निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन केले आहे. बारामती पोटनिवडणुकीबाबत बोलताना फडणवीस यांनी विरोधकांना आवाहन केले. सुनेत्रा पवार यांना सर्वच पक्षांनी पाठिंबा द्यावा. महाराष्ट्रात यापूर्वीही पोटनिवडणुका बिनविरोध करण्याची परंपरा राहिली आहे. जेव्हा आर. आर. आबांचे दुःखद निधन झाले होते, तेव्हा भाजपने मोठेपणा दाखवत निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता आणि ती निवडणूक बिनविरोध केली होती, अशी आठवण फडणवीस यांनी करून दिली. दरम्यान,नाशिकमध्ये लहान मुलांचा बळी घेणाऱ्या दुर्दैवी अपघातावर बोलताना फडणवीस अत्यंत भावूक झाले. ते म्हणाले की, इतक्या लहान मुलांचे असे निधन होणे ही अत्यंत वेदनादायी घटना आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्याशी माझे बोलणे झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या विहिरीचा कठडा अतिशय छोटा असल्याने हा अपघात घडला.

### अखेर अंजनगावातील

जयकुमार गोरे यांनी शिवाजी महाराजांचा पुतळा स्थलांतरित करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करत पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी एक कोटी रुपयांचा निधी देणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे दोन्ही समाजाकडून या घोषणेचे स्वागत झाले. दरम्यान शनिवारी प्रशासकीय अधिकारी यांच्यासोबत दोन्ही समाज एकत्रित येऊन अंजनगावातील सर्व लोकांना आवडेल अशा जागेची निवड करून पुतळ्याचे स्थलांतर होणार आहे. त्यामुळे लक्ष्मण हाके यांचे आंदोलन आता संपुष्टात आले आहे.

### माहूरगडावरील महंत

माहूर गडावरच त्यांच्या पार्थिवावर अंत्यविधी करण्यात येणार आहेत.

महाराजांच्या निधनामुळे माहूर गडावर शोककळा पसरली असून भाविकांनी दुःख व्यक्त केलं. सन १९७८ पासून ते आजतागायत देवस्थानचे महंत म्हणून गादीवर विराजमान होते. महाराजांच्या देवाज्ञेवर खासदार अशोक चव्हाण यांनीही शोक व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. मधुसूदन महाराजांच्या निधनाचे वृत्त समजताच माहूरगड परिसरातील सर्वच व्यापाऱ्यांनी आपली दुकाने आणि व्यावसाय बंद ठेऊन दुःख व्यक्त केले. तर, परिसरातील नागरिक आणि भाविकांनीही गडाकडे धाव घेतली. मोठ्या संख्येने महंत गडाचे भाविक आणि समाजातील प्रतिष्ठित मंडळी देखील महाराजांच्या अंत्यदर्शनसाठी आल्याचं दिसून आलं. खासदार अशोक चव्हाण यांनीही ट्विटरवरुन शोक व्यक्त करत श्रद्धांजली वाहिली.

पान ६ वरून...

### बीड जिल्ह्याचा 'मिशन साथी'

कामगारांना आरोग्य सेवा पोहचविण्याचे काम केले आहे. या कामगारासोबत राज्यातील १७ जिल्ह्यातून ऊसतोडीकरिता स्थालांरित होणाऱ्या कामगारासोबत सुमारे ५ हजार मुले सोबत असतात, या मुलांच्या आरोग्य, शिक्षणाकरिता करावयाच्या उपाययोजना, मासिक पाळीच्यावेळी वापरण्यात येणारी आयुधे, सॅनिटरी नॅपकिन मोफत पुरवठा, अधिकच्या आरोग्य पुरविण्यासोबत आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. येत्या काळात सहकार विभाग, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, ग्रामविकास विभाग, विधी व न्याय विभाग आणि यासंबंधित काम करणारे घटकांसोबत घेवून बैठक आयोजित करण्यात येईल. त्यापूर्वी समाजातील आरोग्य व महिला क्षेत्रात काम करणारे घटक, सामाजिक संघटनांनी पुढे येवून आपल्या सूचना मांडाव्यात, असेही आवाहन डॉ.गोऱ्हे यांनी केले.

आमदार श्रीमती मुंदडा यांनी ऊसतोड महिला कामगारांच्या मुलाच्या आरोग्य व शिक्षणाबाबत सूचना केल्या. कामगारांकरिता करण्यात आलेल्या कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी शासकीय पातळीवरुन होत आहे, कामगारांचे हीत लक्षात घेता साखर कारखाने आणि मुकादमांनी करण्याकरिता प्रयत्न करावे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी समिती सदस्याने बैठकीच्या अनुषंगाने सूचना केल्या.

या बैठकीत डॉ. कंदेवाड यांनी जिल्ह्यानिहाय साखर कारखान्याची संख्या, ऊसतोड पुरुष व महिला कामगाराची संख्या, हंगाम काळात स्थालंतरीत होणारे कामगार, आरोग्य कृतीदल स्थापन केल्या गावांची संख्या, ऊसतोड कामगार तपासणी शिबीर, मासिक पाळी गर्भनिरोधक साधनांचा वापर, आरोग्य पत्रिका, आभा कार्डचे वितरण, रक्तक्षय बाधित महिला कामगारांची संख्या, गर्भवती ऊसतोडू महिला कामगारांची संख्या, तपासणी केलेल्या गर्भवती महिलांची संख्या आदी बाबत माहिती दिली. तसेच बीडचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी बीड जिल्ह्याच्या अनुषंगाने माहिती दिली. महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यात अग्रक्रमाने काम करण्याची आवश्यकता समोर आली.

### नेकनुर पोलिसांपुढे

मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, आज (दि.०४) नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे व लिंबागणेश पोलीस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड यांनी भायाळा साठवण तलाव परिसरातील चोरीच्या घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, विनायक वाणी, शिवाजी वाणी तसेच पाणीपुरवठा कर्मचारी सुखदेव वाणी उपस्थित होते. डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, भायाळा साठवण तलावातून लिंबागणेश व पोखरी गावांना पाणीपुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत सार्वजनिक विहिरीच्या मोटारींच्या वायरची वारंवार चोरी होणे हे गंभीर असून चोरट्यांनी पोलिस प्रशासनालाच आव्हान दिले आहे. यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून चोरट्यांचे मनोबल वाढत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करून चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### अंबाजोगाई पिपल्स

२३ शाखांच्या माध्यमातून ग्राहकांनी दाखवलेला विश्वास आणि कर्मचाऱ्यांच्या सांघिक कार्यामुळे हे शिखर गाठणे शक्य झाले आहे. सध्या बँकेचे भागभांडवल २१ कोटी असून स्वनिधी ५४ कोटींवर पोहोचला आहे. गतवर्षीच्या तुलनेत व्यवसायात १३० कोटींची मोठी वाढ झाली असून स्थापनेपासून बँकेने आपला 'अ' ऑडिट वर्ग कायम राखला आहे. पारदर्शक व्यवहार आणि भक्कम वसुलीमुळे बँकेने आपली विश्वासार्हता सिद्ध केली असल्याचे राजकिशोर मोदी म्हणाले. बँकेच्या यशात संचालक,सभासद, कर्मचारी,ग्राहक याचा वाटा आहे.

### चिंचोली येथे १० एप्रिलपासून

२०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री चैतन्य महाराज शास्त्री (श्री क्षेत्र जुना गहिनीनाथगड) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल. त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी सामुदायिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन संचालक श्री पांडुरंग महाराज कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचोली, चिखली, निवडुंगा, बहाली, अंतापूर, मुंगगाव, सावरगाव, सुप्पा आणि परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने या श्रवणभक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### अनोळखी पुरुष प्रेताची ओळख

सुजलेले व सुरकुत्या पडलेले असे.अशा वर्णनाचा असून आम्ही तेथील स्थानिक नागरिकांच्या मदतीने सदरच्या बेशुध्द ईसमास ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी सदर ईसमास तपासून पाहीले असता दि.०३ एप्रिल शुक्रवार रोजी वेळ ०२:१० वाजता मृत घोषीत केले. त्या नंतर आम्ही सदर अनोळखी ईसमांच्या नातेवाईकांचा शोध घेतला असता मिळून न आल्याने व पुढील कार्यवाही करण्यासाठी मा. वैद्यकिय अधिकारी ग्रामीण रुग्णालय माजलगाव यांना पत्र देऊन सदरचे अनोळखी ईसमाचे प्रेत शितगृहात ठेवण्याची विनंती केली केल्याने त्यांनी सदरचे प्रेत हे ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे शितगृह उपलब्ध नसल्याने शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अंबाजोगाई येथे शितगृहात दाखल करण्यात आले आहे. तरी वर नमुद वर्णनाच्या अनोळखी इसमाची माहीती मिळुन आल्यास तात्काळ पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथील फोन नं.०२४४३२३४१२० तपासिक अधिकारी के. बी. माकणे. मोनं.९०११९२३७७, या नंबरवर कळवण्याचे आवाहण करण्यात येत आहे. आहे.

### ३५३ चा गुन्हा दाखल

असल्याचे बागवाले यांनी स्पष्ट केले.

नगर परिषदेच्या मंजूर इस्टीमेटमध्येच सुमारे ९ लाख रुपयांची तरतूद पर्यायी पुलासाठी करण्यात आलेली असताना, सत्ताधाऱ्यांनी त्या कामाकडे दुर्लक्ष करून थेट मुख्य पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ करणे हे निष्काळजीपणाचे व नागरिकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करणारे असल्याची टीका त्यांनी केली.

पान ६ वरून...

पावसाळ्यात हा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व शेतकरी यांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो. त्यामुळे पर्यायी पूल उभारल्याशिवाय मुख्य काम सुरू करणे योग्य नाही, असे ठाम मत नितीन बागवाले यांनी व्यक्त केले. तसेच, नागरिकांच्या सोयी-सुविधा आणि सुरक्षितता हाच विकासाचा खरा पाया असून, केवळ औपचारिक शुभारंभ करून जनतेच्या अडचणींकडे दुर्लक्ष करणे निंदनीय असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, अंबेवेस परिसरातील नागरिकांनीही नितीन बागवाले यांच्या मागणीला समर्थन दर्शवले असून, लवकरात लवकर पर्यायी पूल उभारण्यात यावा, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे.

लोकप्रतिनिधीचा आवाज दडपण्याचा प्रयत्न-नगरसेवक नितीन बागवाले

अंबेवेस परिसरातील जुन्या पुलाच्या पुनर्निर्माणासाठी शुभारंभ करण्यात आला ही चांगली बाब आहे. मात्र, नगरपरिषदेच्या इस्टिमेटमध्ये प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी पुलासाठी ९ लाख रुपयांची तरतूद असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

याबाबत मी आवाज उठवला असता सत्ताधारी पक्षाच्या वतीने माझ्यावर ३५३ चा गुन्हा दाखल करण्याची धमकी विद्यमान नगराध्यक्षांच्या पतीकडून देण्यात आली. लोकप्रतिनिधीला अशा प्रकारे दडपण्याचा प्रयत्न होणे निंदनीय असून, हा प्रकार लोकशाहीस घातक आहे.

### गेवराई तालुक्यात भगव

गेवराई शहर प्रमुख मुकेश महाजन, शिवसेना तालुकाप्रमुख श्री ऊध्दव मडके, युवासेना तालुकाप्रमुख बिभिषण आप्पा मोघे, , युवासेना विधानसभा प्रमुख ऊमेश शिंदे, शिवसेना वि.अध्यक्ष नवनाथ गवते, ओबीसी शिवसेना तालुकाप्रमुख श्री बाळासाहेब खेडकर, युवा सेना शहर प्रमुख गणेशराव पवार, शिवराज ऊगले, शिवसेना नेते प्रदोष जाधव, यांच्या सह शिवसेनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते कार्यक्रमात मनोज शिंदे यांनी म्हणाले की, बीड जिल्हा हा शिवसेनेच्या दृष्टीने महत्त्वाचा असून येथे संघटन अधिक भक्कम करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय भूमिका बजावणे गरजेचे आहे. गावागावांत शाखा बळकट करून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शिवसेनेचा विचार पोहोचवला जाईल यासाठी शिवसैनिकांनी काम करावे. आगामी काळात शिवसैनिकांच्या बळावरच मोठे यश मिळवू असे आवाहन शिंदे यांनी केले. शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री श्री. एकनाथराव शिंदे साहेब, संसदरत्न डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड श्री. चंद्रकांत आप्पा नवले यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्यातील प्रत्येक बुथ वर, प्रत्येक गावात बुथनिहाय बीएल ए नेमणूक करण्यात यावी, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी आपल्या मार्गदर्शनात शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून जनतेच्या भावना आणि प्रश्नांशी जोडलेली चळवळ असल्याचे सांगितले. संघटन वाढीसाठी युवकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

### आदित्य शिक्षण संस्थेच्या

घेण्यात आली होती. अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत अजयने आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत यश संपादन केले. अजयने २०१७ ते २०२१ या कालावधीत आदित्य कृषी शाखेतून आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी योग्य मार्गदर्शनामुळे आज राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करत आहेत. अजयच्या या दुहेरी यशाबद्दल त्याचा व त्याच्या पालकांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य श्याम भुतडा, डॉ. डी. बी. सातपुते, प्रा. प्रिया गव्हाणे, डॉ. खेडकर, डॉ. ठोके, डॉ. मोरे यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्याचे कौतुक केले.

**आम्हाला मुलाचा अभिमान आहे**

आमच्या मुलाने मिळवलेल्या या यशाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आदित्य महाविद्यालयाने वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळेच अजय इथपर्यंत पोहोचू शकला. आम्ही आदित्य शिक्षण संस्थेचे अत्यंत ऋणी आहोत.

-श्रीराम गिरी, शेतकरी पालक. राहणार-जिल्हा जालना.

### महात्मा फुले यांचे जन्मशताब्दी

करून देण्यात याव्यात. स्त्री शिक्षण, स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासासाठी फुले - सावित्रीबाई विचारांवर आधारित विशेष योजना सुरू करण्यात याव्यात. कलिना येथील 'फुले - शाहू - आंबेडकर आंतरराष्ट्रीय ग्रंथालय' इमारतीचे लोकार्पण करण्यात यावे आणि नायगावचे 'क्रांतीज्योती सावित्रीनगर' असे नामकरण करण्यात यावे. ''महात्मा फुले २००'' हे विशेष बोधचिन्ह मंजूर करून ते राज्य शासनाच्या सर्व शासकीय पत्रव्यवहारावर वापरण्यात यावे. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी महात्मा फुले यांच्या नावाने पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात यावा. सर्व विद्यापीठांच्या पदवी व पदव्युत्तर स्तरावर तसेच सीबीएसई व स्टेट बोर्डाच्या शालेय अभ्यासक्रमात महात्मा फुले यांच्या साहित्याचा समावेश करण्यात यावा. महात्मा फुले जयंतीदिनी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांत अभिवादन व प्रबोधन सत्रे राबविण्यात यावेत. राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय महात्मा फुले सामाजिक संशोधन केंद्र आणि सावित्रीबाई फुले महिला आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र स्थापन करावे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या छायाचित्रांचे मुद्रण करण्यात यावे आणि चित्ररूपातील महात्मा फुले चरित्र प्रकाशित करण्यात यावे. ११ एप्रिल रोजी प्रत्येक शाळेत प्रभात फेरी, अभिवादन आणि विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात यावे. शासनाच्या महात्मा फुले यांच्या जीवनावरील चित्रपट या वर्षात प्रदर्शित करावा. त्यांचे विचारधन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी शासनाच्या वतीने विदेशातील विद्यापीठांमध्ये कार्यक्रम घ्यावे. महात्मा फुले यांचे विचार केवळ इतिहासाचा भाग नसून आजच्या आणि उद्याच्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहेत. म्हणून 'महात्मा फुले कार्य गौरव वर्ष' म्हणून साजरे करण्यासाठी हे उपक्रम राज्यभर व्यापक स्वरूपात राबविले जावेत, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

याच अनुषंगाने सर्व समता सैनिकांनी सन २०२६ ते २०२७ या महात्मा फुले कार्य गौरव वर्षांमध्ये गाव, तालुका, जिल्हा, विभाग पातळीवर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचे विचार तळागाळात रुजवण्यासाठी त्यांचे कार्य व विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्याख्यानमाला, जनजागृती अभियान असे उपक्रम राबवून हे संपूर्ण वर्ष महात्मा फुले यांच्या विचारांनी बहरून टाकावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

cmyk

## पंचनामे करून तत्काळ मदत द्या –भाई थावरे

माजलगाव : जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पिकांसह फळबागाही अक्षरशः उध्वस्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर तातडीने नुकसानग्रस्त क्षेत्रांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी जोरदार मागणी शेतकरी नेते भाई गंगाभीषण थावरे यांनी केली आहे. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा, भाजीपाला तसेच आंबा, डाळिंब यांसारख्या फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. आधीच वाढत्या खर्चामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर या नैसर्गिक आपत्तीने आणखी आर्थिक संकट कोसळले आहे. यामुळे महसूल व कृषी विभागाने तातडीने सर्वेक्षण करून पारदर्शक पद्धतीने पंचनामे पूर्ण करावेत आणि शासनाने लवकरात लवकर मदत जाहीर करून ती थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना वेळेत मावेजा न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत लोकप्रतिनिधींच्या वाहनांना अडवण्याचा इशाराही भाई थावरे यांनी दिला आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि.५ एप्रिल २०२६


# भाजप कार्यकर्त्यांनी पक्षाचे सेवक म्हणून काम करावे-राम कुलकर्णी

### पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान; डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून आयोजन

बीड । प्रतिनिधी

दि.४ : भाजप कार्यकर्त्याने स्वतःला कार्यकर्ता किंवा नेता न समजता पक्षाचा सेवक मानून समाजाच्या गरजेनुसार काम करावे. राष्ट्रभक्ती हा आपल्या कामाचा मूलाधार असून जनतेची सेवा करणे हेच अंतिम ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे राज्य प्रवक्ता तथा पत्रकार राम कुलकर्णी यांनी व्यक्त केले. पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान २०२६ अंतर्गत बीड शहर मंडळाच्यावतीने आयोजित सौ.के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात प्रशिक्षण शिबिराची सांगता शुक्रवारी (दि.४) झाली.

या शिबिराचे आयोजन डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राम कुलकर्णी हे बोलत होते. व्यासपीठावर भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शहराध्यक्ष अशोक लोढा, माजी तालुकाध्यक्ष चंद्रकांत फड आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते म्हणाले, स्व.गोपीनाथ मुंडे यांनी ग्रामीण भागात सामान्य स्तरावर काम करत पक्षाचा विस्तार केला. कार्यकर्त्यांनी तोंडात साखर, डोक्यात




बर्फ आणि पायात चक्र ठेवून सातत्याने लोकांमध्ये राहिले पाहिजे. अंत्योदयाच्या भावनेतून सामान्य लोकांच्या अपेक्षा पूर्ण करणारा कार्यकर्ता घडला पाहिजे. यावेळी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर, बीड नगरपरिषदेच्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, शिवाजी मुंडे, प्रा.देवीदास नागरगोजे, अजय सवई, नवनाथ शिराळे, डॉ.रवींद्र घुंबरे, मिरा गांधले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात योगा शिबिराने झाली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक लोढा यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भाजपचे राष्ट्रभक्ती, सामाजिक जागृतीसाठी कार्य : डॉ.क्षीरसागर** : समारोप सत्रात बीड नगरपरिषदेच्या भाजपच्या गटनेच्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी भारतीय जनता पार्टी हा विचारप्रधान पक्ष असून राष्ट्रभक्ती आणि सामाजिक जागृतीसाठी कार्य करतो, असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांनी शिस्त, समन्वय आणि समर्पण ठेवून काम करत सरकारच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. या शिबिराचे आयोजन करण्यासाठी डॉ.क्षीरसागर दाम्पत्याने पुढाकार घेतला.

**कार्यविस्तारासाठी सातत्य महत्त्वाचे : चंद्रकांत फड** : कार्य विस्तार कामाची दृष्टी या विषयावर सत्राध्यक्ष नवनाथ शिराळे यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रकांत फड यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, कार्यविस्तार म्हणजे सातत्याने काम करणे होय. सत्तेत आल्यानंतर कामाचा वेग वाढवून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा.

**योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवावी : शांतीनाथ डोरले**

सरकारच्या योजना व कामगिरी या विषयावर शांतिलाल डोरले यांनी मार्गदर्शन करताना प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला गॅस योजना, आयुष्यमान भारत योजनेसह विविध योजनांची माहिती दिली. या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी पार पाडावी, असे त्यांनी नमूद केले.

**बुथ मजबूत तर पक्ष मजबूत : शिवाजी मुंडे**

बुथ व्यवस्थापन या विषयावर शिवाजी मुंडे यांनी मार्गदर्शन करताना ''बुथ सक्षम तर पक्ष सक्षम'' हा मंत्र दिला. बुथ प्रमुखांनी आपल्या क्षेत्रातील नागरिकांशी सतत संपर्क ठेवून शासनाच्या योजना समजावून सांगाव्यात, असे त्यांनी सांगितले.

**'मन की बात'मधून समाजकार्याला प्रोत्साहन : सलीम जहांगीर** : मन की बात या विषयावर सलीम जहाँगीर यांनी मार्गदर्शन करताना पंतप्रधानांच्या संवादातून समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन मिळते, असे सांगितले. कार्यकर्त्यांनी या माध्यमातून लोकांशी संवाद वाढवावा, असे त्यांनी नमूद केले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची यशोधरा विहार येथे प्रतिष्ठापना

### का.भिकाजीराव वाघमारे यांच्या स्मरणात संकल्पपूर्ती सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील फुलेनगर, माजलगाव येथील यशोधरा बुद्धविहार येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात संपन्न झाली. कालकथित राधाबाई भिकाजीराव वाघमारे आणि कालकथित भिकाजीराव किसन वाघमारे (माजी जि.प. सदस्य, बीड) यांच्या पावन स्मृतीनिमित्त 'भीम प्रतीरूपाचे दान' या संकल्पपूर्तीतून हा ऐतिहासिक सोहळा पार पडला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रकाश सोळंके उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षपद बाबुराव पोटभरे यांनी भूषविले. यावेळी प्रकाश कांबळे, माजी जि.प. सदस्य डॉ.श्रीराम खळगे, के.व्ही. साळवे, धम्मानंद साळवे, विजय साळवे, कचरू खळगे, डॉ.अशोक तिडके, अंकुश जाधव, नगरसेवक अशोक लांडगे, सदानंद प्रधान, सचिन जावळे, सय्यद नूर, विजय शिंदे, प्रशांत शेटे, मेहमूद कुरेशी, राकेश साळवे, सदाशिव भालेराव, नवनाथ धाईजे, भीमराव टाकणखार, अमोलरत्न डोंगरे, भास्कर घाडगे यांच्यासह अनेक उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान आमदार प्रकाश सोळंके, बाबुराव पोटभरे,



विजय साळवे, सदाशिव भालेराव, अमोलरत्न डोंगरे आणि के. व्ही. साळवे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. पू.भदंत धम्मशील थेरो व पू.भदंत पिंडोल यांनी धम्मदेशना देत वाघमारे परिवाराच्या या दातृत्वाचे आणि उपक्रमाचे विशेष कौतुक केले. बाबुराव पोटभरे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, ''या बुद्धविहाराचे अपूर्ण राहिलेले काम येत्या विजयादशमी पर्यंत व बुद्धविहाराकडे येणारा रस्ता एका महिन्यात आम्ही पूर्ण करू. बुद्धाने सांगितलेल्या मार्गावर सर्व उपासक-उपासिकांनी आचरण करणे हीच खरी मानवंदना ठरेल.'' यावेळी मार्गदर्शन करताना धम्मशील महाथेरो म्हणाले की, ''डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला बुद्ध धम्माचा मार्ग दाखवला. निसंकोच मनाने केलेले दान हेच खरे दान असते, जे जीवनभर सुख देऊ शकते. केवळ नावासाठी केलेले दान समाधान देऊ शकत नाही. डॉ.आंबेडकर हे बुद्ध धम्म वाहिनी आहेत. त्यांच्या विचारांचे आचरण करणे आजच्या काळात गरजेचे आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, ''बुद्धावर बोलणे सोपे आहे, परंतु त्यांचे विचार कृतीत आणणे कठीण आहे. आंबेडकरवादी चळवळीचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी न करता, ती जिवंत ठेवणे आणि बुद्धविहाराचे पावित्र्य जपणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. या कार्यक्रमामुळे फुलेनगर व परिसरात उत्साहाचे आणि धम्ममय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाघमारे यांच्या सर्व मुलींनी, त्यांच्या परिवारातील सदस्यांनी तसेच यशोधरा बुद्धविहाराचे सचिव बाबासाहेब जाधव सर व सर्व ट्रस्ट सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## पाटोदा शहरात अखंड नाम-जप-यज्ञ व सामूहिक गुरुचरित्र पारायण सोहळा

पाटोदा। प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणित) अंतर्गत पाटोदा येथील क्रांतीनगर सेवा केंद्रात श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ८ एप्रिल ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत 'अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताह' आणि 'सामूहिक श्री गुरुचरित्र पारायण' सोहळा संपन्न होणार आहे. परमपूज्य गुरुमाऊली श्री अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सोहळ्याचे मानवी जीवनातील संकटे दूर करण्यासाठी आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी विशेष महत्त्व असल्याचे केंद्रामार्फत सांगण्यात आले आहे.

दैनंदिन सेवा व भरगच्च कार्यक्रम: सप्ताह कालावधीत दररोज पहाटे ७:३० वाजल्यापासून विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे: सकाळी: औदुंबर प्रदक्षिणा, भूपाळी आरती, सामूहिक श्री गुरुचरित्र वाचन आणि नित्य स्वाहाकार. दुपारी: भोजन विश्रांतीनंतर श्री स्वामी समर्थ सारामृत वाचन. सायंकाळी: औदुंबर प्रदक्षिणा, आरती आणि मंत्रपुष्पांजली. रात्री: श्री स्वामी चरित्र, श्री नवनाथ १०० श्लोकी आणि इतर सामूहिक वाचन. सप्ताहातील विशेष आकर्षणे:८ एप्रिल (बुधवार): ग्रामदेवता निमंत्रण, ध्वजारोहण आणि मंडळ मांडणी. ९ एप्रिल (गुरुवार): मंडल स्थापना आणि अग्निस्थापना. १० ते १४ एप्रिल: श्री गणेश याग, श्री चंडी याग, श्री स्वामी याग, श्री गीताई याग आणि श्री रुद्रयाग यांसारखे विशेष विधी संपन्न होतील. १५ एप्रिल (बुधवार): सकाळी १०:३० वाजता 'श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सांगता समारंभ' होईल. त्यानंतर महाआरती आणि महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होईल. विशेष सूचना व उपक्रम: या सप्ताहात श्री स्वामी समर्थ मंत्राचा अखंड जप केला जाईल. विशेष म्हणजे, श्री गुरुचरित्र पारायण करण्यासाठी महिलांनाही संधी देण्यात आली आहे. महत्वाची नोंद: हे सर्व मुख्य सोहळे पाटोदा येथील क्रांतीनगर सेवा केंद्रात पार पडणार आहेत.

रस्तागल्ली सेवा केंद्र (पाटोदा): या केंद्रात फक्त गुरुचरित्र पारायण आणि आरतीची सेवा आयोजित करण्यात आली आहे. भाविकांना आवाहन: या आध्यात्मिक सोहळ्यामुळे कौटुंबिक सुख-शांती लाभते, वास्तुदोष व पितृदोषांचे निवारण होते आणि आरोग्य व नोकरी-व्यवसायातील अडचणी दूर होतात, असा अनेक भाविकांचा अनुभव आहे. तरी पाटोदा शहर व परिसरातील सर्व स्वामी भक्तांनी आणि माता-भगिनींनी या अमृतमय सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

## मोठेवाडी येथील शाळेत कौशल्य विकास व विज्ञान प्रदर्शन

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील पी.एम.श्री. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत गुरूवारी विद्यार्थ्यांनी विज्ञान व नाविन्यपूर्ण कौशल्य विकास प्रदर्शन सादर केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी ज्वलामुखीचा उद्रेक,मानवी फुप्फुस,पाण्यातील प्रतिबिंब,पाण्यावर पेटणारा दिवा,तेल पाण्यावर तरंगते,घर्षण बल,उष्णतेनें हवेचे प्रसारण, आहारातुन मिळणारी जीवनसत्वे, वाहतुकीचे नियम यासह विद्यार्थ्यांनी स्वतः ट्रॅक्टर, कचरा संकलन पीकप, ट्रॅव्हलस, कार, लिफ्ट, रहाटपाळणा,पवन ऊर्जा,सामान वाहतुक गाडा असे विविध बॅटरीवर चालणारी साधने बनवली होती हे प्रदर्शन पाहण्यासाठी गावातील पालकवर्ग उपस्थित होता सर्वांनी विधार्थ्यांचे व नाविन्य पूर्ण उपकम एका ग्रामीण भागातील शाळेत राबवला म्हणुन शाळेचे कौतुक केले यासाठी



माजी सरपंच तथा संचालक छत्रपती सहकारी साखर कारखाना ली.सावरगाव अविनाश गोंडे, उपसरपंच अंगद खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे, मा. शा.व्य स अ.संभाजी पाष्टे, अशोक रासवे, प्रकाश शेळके, गणेश सर्जे, शा.व्य स स रामेश्वर काजळे यांनी उपस्थिती दर्शवुन विधार्थ्यांचे कौतुक केले यासाठी मुख्याध्यापक तुकाराम शिंदे व शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

## अर्जुने यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त

माजलगाव। प्रतिनिधी

ध्येय एज्युकेशन फाउंडेशन (महाराष्ट्र राज्य), एज्युकेशन आयकॉन्स समिट २०२५ हा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५, हा जि प प्रा शा जेवळी दक्षिण येथील शिक्षक श्री अर्जुने अनिल पुंडलिकराव यांना आंतरराष्ट्रीय ख्यातीचे राष्ट्रपती पुरस्कार विजेते वारे गुरुजी तसेच ध्येय फाउंडेशन अध्यक्ष सुदाम शेंडगे आणि अन्य मान्यवर यांच्यामार्फत प्राप्त झाला आहे.

हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेली अविरत धडपड, शैक्षणिक उपक्रमातील नवीनता व समाजातील आपले प्रभावी योगदानासाठी दिला जातो. ध्येय एज्युकेशन फाउंडेशन ही संस्था आज महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांसाठी एक मार्गदर्शक संस्था ठरली आहे. हा सन्मान सोहळा ग.दि.माडगूळकर नाट्यगृह निगडी, पिंपरी चिंचवड, पुणे येथे शिक्षक श्री अर्जुने




अनिल पुंडलिकराव यांना २९ मार्च २०२६ रोजी सन्मानपूर्वक प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह, शाल व श्रीफळ देऊन प्रदान करण्यात आला. आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री भीमाशंकर साखरे, उपाध्यक्ष व सर्व शालेय समितीचे सदस्य, पत्रकार श्री बसवराज होनाजे साहेब,युवा नेते शिवराज चिनगुंडे साहेब ,शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, ग्रामस्थ तसेच मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले आहे.या पुरस्कारामुळे श्री अर्जुने सर यांच्या कार्याची उंची वाढली असून सर्वत्र त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.संपूर्ण धाराशिव जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

## गुणांसोबत हवी संस्कारांची जोड, यातून घडतो यशस्वी विद्यार्थी - प्रा.मोटेगावकर

### विद्यार्थ्यांच्या मानसिकतेनूसार पालकांनी दृष्टिकोन बदलावा – डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राजश्री शाहू मल्टीपर्पज असोसिएशन, लातूर संचलित ढगेज्? कोचिंग क्लासेस, अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित दहावी विद्यार्थी मार्गदर्शन, गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण व आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अंबाजोगाईतील विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून लातूरच्या मोटेगावकर कोचिंग क्लासेसचे सर्वेसर्वा प्रा.मोटेगावकर तर प्रमुख व्याख्याता म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार व शिक्षण तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले उपस्थित होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.मिलिंद ढगे होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष गौतम बनसोडे, गणिताचे प्रा.धुळे तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सचिन आगलावे तसेच तालमार्तंड प्रा.राजकुमार ठोके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी क्लासेसचे संचालक प्रा.डॉ.ढगे यांनी प्रास्ताविक करताना



संकुलात राबविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांचा सविस्तर आढावा घेतला. इंग्रजी ग्रामर, रेग्युलर इंग्रजी तसेच स्तरनिहाय लेवल झिरो, लेव्हल वन, लेव्हल टू व स्पोकन इंग्लिश या अभिनव पद्धतीतून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. महादेव गाढवे व प्रमोद सिताप हे गणित व विज्ञान हे विषय विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे रूजवत असल्याचे सांगितले. या उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोठा उपयोग होत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी संस्थेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या नेटिजन्स प्री-प्रायमरी नॅशनल स्कूल, अंबाजोगाई या शाळेच्या प्रगतीचाही गौरवपूर्ण आढावा सादर करण्यात आला. यंदा सुरू होत असलेल्या इयत्ता पहिलीच्या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. आपल्या उदघाटकीय भाषणात डॉ.मोटेगावकर यांनी पालकांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांच्या प्रगतीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले. प्रगती ही केवळ गुणांची आकडेवारी नसून ती संस्कारांची शिदोरी असली पाहिजे, असे ठामपणे सांगत त्यांनी पालक-विद्यार्थी व शिक्षक-विद्यार्थी नात्यातील दृढतेवर भर दिला. कष्टाने मिळालेल्या उत्पन्नाचा योग्य उपयोग करून विद्यार्थ्यांनी स्वतःची प्रगती साधावी, असे भावनिक आवाहन ही त्यांनी केले. प्रमुख पाहुणे तथा मार्गदर्शक व्याख्याते डॉ.राजेश इंगोले यांनी विद्यार्थ्यांच्या बदलत्या वयानुसार त्यांच्या बदलत्या मानसिकतेवर सखोल भाष्य केले. आपल्या पाल्याचा हा शारीरिक, मानसिक बदल, त्यांच्या मधील हॉर्मोनल बदलामुळे त्यांची वागण्याची, बोलण्याची पद्धत पालकांनी समजून घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मागे राहण्यामागील विविध मानसिक कारणे सोप्या भाषेत विषद करीत त्यांनी पालकांनी आपल्या विचारसरणीत आवश्यक ते बदल करून विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक गरजांकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. एखाद्या विद्यार्थ्याला अभ्यासात यश मिळावायचे असेल तर त्याला त्यात आवड निर्माण झाली पाहिजे, ही गोडी निर्माण करण्यासाठी पालकांनी, शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले पाहिजे. त्याला सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. अभ्यासात निर्माण झालेली आवड आणि अभ्यासातील सातत्य हीच खरी यशाची गुरूकिल्ली असल्याचे डॉ.इंगोले यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमात आदर्श शिक्षक पुरस्कार सचिन सुमन शंकरराव आगलावे (श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई) यांना प्रदान करून त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव गाढवे यांनी केले, तर आभार सौ.ढगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री गाडवे, प्रमोद सिताप, श्रीमती के, श्रीमती कुलकर्णी, शितल साठे, श्रीमती साळुंखे, कु.सई व चि.प्रशांत ढगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३०४/२०२५**
**डिगांबर किसन खंदारे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कारेगव्हाण**

पहा
डिगांबर किसन खंदारे रा. कारेगव्हाण ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक समाधान दिगांबर खंदारे यांचा दिनांक १५/०६/२००८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस कारेगव्हाण ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कारेगव्हाण ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक ०६/०३/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०६/०४/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

cmyk

# राज्यात २ लाख ४ हजार हेक्टर शेतीपिकांचे नुकसान

## शेतकऱ्यांना लवकरात-लवकर मदत देणार, कृषिमंत्री भरणे यांची ग्वाही

पुणे : राज्यात रब्बी पिकांना नैसर्गिक आपत्तीचा तडाखा बसला आहे. हातातोंडाशी आलेला घास या आपत्तीने हिरावून घेतला आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदतीची अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर अवकाळी पाऊस आणि गारपीटीने बाधित शेतकऱ्यांना लवकरात-लवकर मदत दिली जाईल, अशी ग्वाही राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शनिवारी दिली.



रब्बी हंगामातील नुकसानीबद्दल माध्यमांशी बोलताना कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले की, ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, तोंडात आलेला घास वाया गेला आहे. त्या सर्व शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनाम्यांचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. पंचनाम्यांचा अहवाल प्राप्त होताच, राज्य सरकार लवकरात लवकर मदत करेल. शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेणारे हे सरकार आहे, असे ते म्हणाले. कृषिमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अवकाळी पाऊस आणि गारपीटीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये २९ जिल्ह्यात २ लाख ४ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. विशेषत: केळी, गहू, मका, द्राक्ष, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, भाजीपाला, डाळींब, कांदा, संत्रा, या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच राज्यात फेब्रुवारी-मार्चसह एप्रिलच्या पाहिल्या आठवड्यापासून अवकाळी पाऊस आणि गारपीटीने हजेरी लावली आहे. त्यामुळे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात १६ जिल्ह्यात पिकांना तडाखा बसला असून एकूण नुकसान २ लाख ४ हजार हेक्टरवर पोहचल्याचे कृषिमंत्री भरणे म्हणाले. राज्यात अवकाळी पावसाने आणि गारपीटीने शेतीपिकांसह पशुधनाचे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे काही भागात जनावरांचे गोठे कोसळले आहे. तर घरावरील पत्रे उडून गेली आहेत. तसेच झाड उन्मळून पडल्याने घरांचे आणि गोठ्यांचे नुकसान झाले आहे. तर वीज पडून शेतकरी मृत्यूमुखी पडल्याच्या घटना घडल्या आहेत. दरम्यान, खरीप हंगामात शेतकऱ्यांना खताची गरज असते. परंतु कृषी केंद्राकडून खतांचा काळाबाजार सुरु असल्याचे नुकतेच समोर आले आहे. त्यामुळे गैरप्रकार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही कृषिमंत्री भरणे यांनी दिला.

मुख्यमंत्री निवडणुकीच्या प्रचारात दंग

कृषिमंत्री भरणे यांनी सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे असल्याचा दावा केला आहे. राज्यात अवकाळी आणि गारपीटीने नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र केरलमच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात दंग असल्याचे पाहायला मिळत आहेत. केरलमचे पारंपारिक वाद्य वाजवून आनंद घेत आहेत. राज्यात मात्र शेतकरी मदतीसाठी आशा लावून आहेत. तर कृषिमंत्री मात्र पंचनामे सुरु असून लवकरात लवकर मदत दिली जाईल, असे कोरडे आश्वासन देऊन वेळ मारून नेत आहेत, अशी टीका शेतकऱ्यांसह शेतकरी नेत्यांकडून केली जात आहे.

## शेवग्याच्या या वाणाची लागवड करा; वर्षभर मिळेल भरघोस उत्पादन!



राज्यात पारंपारिक पिकांना फाटा देत, फळ पिकांच्या किंवा मग भाजीपाला पिकांच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल अधिक दिसून येत आहे. विशेष म्हणजे फळे आणि भाजीपाला पिकांना बाजारात वर्षभर मागणी असते. ज्यामुळे त्यातुन शेतकऱ्यांना मोठी आर्थिक कमाई देखील होते. हीच बाब लक्षात घेऊन राज्यातील बरेच शेतकरी सध्या शेवगा लागवड करताना दिसून येत आहेत. शेवगा शेती ही फायद्याची शेती मानली जाते. कारण शेवग्याच्या झाडापासून प्रामुख्याने फळ, पाने, मुळे यांसारख्या सर्वच बाबींना मागणी असते. त्यामुळे नव्याने शेवगा लागवडीबाबत माहिती जाणून घेण्याची इच्छा असणारे अनेक शेतकरी असतात.

मिळते भरघोस उत्पादन : शेवग्याच्या या विशेष प्रजातीचे नाव 'पीकेएम-१' असे आहे. शेवग्याच्या जातीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ती बारा महिन्यातून दोन वेळा फळ देते. विशेष म्हणजे शेवग्याच्या या जातीच्या एका झाडापासून शेतकऱ्यांना वर्षभर ३० किलोपर्यंत अर्थात ६५० ते ८५० शेंगा मिळतात. बाजारात प्रामुख्याने शेवग्याला ८० से १०० रुपये प्रति किलोचा दर हमखास मिळतो. तर घाऊक बाजारात शेवग्याचा दर हा ५० ते ६० रुपये प्रति किलोच्या खाली कधीच नसतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना या वाणाच्या माध्यमातून मोठी आर्थिक कमाई करता येते.'पीकेएम-१' वाणाची वैशिष्ट्ये : हे वाण तामिळनाडू कृषी विद्यापीठाच्या पेरियाकुलम् फळबाग संशोधन केंद्राने विकसित केले आहे. लागवडीनंतर केवळ सहा महिन्यात या वाणाला शेंगा येतात. एका शेंगेची लांबी ही साधारपणे ४० ते ४५ सेंटिमीटर इतकी असते. विशेष म्हणजे हे वाण महाराष्ट्रातील वातावरणात वर्षातून दोन वेळा भरघोस शेंगा देते. या वाणाच्या शेंगा या वजनदार, चविष्ट असतात. मात्र या वाणाचे शेंगेचे 'बी' फारसे मोठे नसते. 'पीकेएम-१' या वाणाची झाडे साडेचार ते पाच मीटर उंच वाढतात. या वाणाच्या मदतीने मिळून शेतकऱ्यांना दोन्ही हंगामात मिळून एका झाडापासून ६५० ते ८५० शेंगा मिळतात.

## जनावरांच्या जीवघेण्या फऱ्या आजारावरील उपाय!

महाराष्ट्रातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात दुधाचे उत्पादन घेतले जाते. मात्र डेअरी व्यवसाय करताना जनावरांच्या आहारासोबतच त्यांच्या आरोग्याकडे देखील लक्ष देणे तितकेच आवश्यक असते. दुधाळ जनावरांना शेतकरी खूप जपत असतात. मात्र, कधी-कधी जनावरांकडे दुर्लक्ष झाल्यास, ते अनेक आजारांचे शिकार होतात. जनावरांना होणारा 'फऱ्या रोग' हा देखील त्यापैकीच एक आहे. 'फऱ्या रोग' हा जनावरांना होणारा जीवघेणा आजार असून, त्याच्यामुळे शेतकऱ्यांचे दुधाळ जनावर दगावण्याची देखील भीती असते. त्यामुळे हा आजार नेमका काय आहे? या आजाराची लक्षणे काय आहेत? आणि या आजारावर नेमके काय उपाय आहेत? याबाबत सविस्तरपणे जाणून घेण्याची गरज आहे.



असा होतो 'फऱ्या रोग' : फऱ्या रोगास प्रामुख्याने अवकाळी पाऊस किंवा पावसाळ्याच्या दिवसांमध्ये जनावरे बळी पडतात. हा रोग मातीमध्ये असलेल्या क्लोस्ट्रीडियम जिवाणूमुळे जनावरांना होतो. हा जिवाणू मातीमध्ये वर्षानुवर्षे जिवंत असतो. पाऊस झाल्यानंतर जनावरास शरीरावर किंवा पायांना थोडी जरी जखम होऊन रक्त निघालेले असेल तर मातीमधील हा जिवाणू त्या जखमेच्या ठिकाणाहून जनावरास बाधित करतो.

या रोगाची लक्षणे : जनावरांना हा फऱ्या रोग झाल्यास त्यांचे शरीराचे तापमान १०७ डिग्रीपर्यंत पोहचते. अर्थात जनावरास तीव्र ताप येतो. या आजारात संबंधित जनावर चारा किंवा पाणी पिणे सोडते. याशिवाय हा रोग झालेल्या जनावराचे सर्व मागील पुढील पाय सुजतात. ज्यामुळे संबंधित दुधाळ जनावर हे लंगडत चालते. किंवा मग अशा जनावरास सुजलेल्या पायांमुळे कधी-कधी चालता देखील येत नाही. कारण या आजारामुळे जनावरास सर्वात जास्त त्रास हा पायांना होत असतो. कधी-कधी या फऱ्या रोगामुळे संबंधित जनावराचा दोन किंवा तीन दिवसांमध्ये मृत्यू देखील होतो.

आजारावरील उपाय : जनावरांना होणारा फऱ्या हा असा रोग आहे. जो झाल्यास संबंधित जनावरावर उपचार करणे खूप कठीण असते. ज्यामुळे दूध उत्पादकांनी अवकाळी पाऊस किंवा पावसाच्या वातावरणात आपल्या जनावरांची काळजी घेणे हाच त्यावरील सर्वोत्तम उपाय आहे. आणि काळजी घेऊनही या रोगाने जनावरास ग्रासल्यास, लक्षणे दिसताच आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन तात्काळ या रोगाचा इलाज व लसीकरण करून घ्यावे. जेणेकरून अशा जनावरास अधिक त्रास न होता. ते लवकर बरे होण्यास मदत होईल.

## लागवडीनंतर केळीच्या बागेचे व्यवस्थापन

केळीच्या बागेत आंतरमशागत, नियमित स्वच्छता व योग्य देखभाल केल्यास उत्पादन चांगले मिळते. हवामान सतत बदलत असल्यामुळे केळीच्या बागेची योग्य काळजी घेणे खूप गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने दिलेल्या उपायांचा अवलंब केल्यास झाडांचे नुकसान कमी होऊन चांगले उत्पादन मिळवू शकतात. आंतरमशागत : बाग नेहमी तणमुक्त ठेवावी. केळी बाग स्वच्छ ठेवण्यासाठी उभी-आडवी कुळवणी वेळेवर करावी. लागवडीनंतर ३ ते ४ महिन्यांपर्यंत कुळवणी करणे फायदेशीर ठरते. दर दोन महिन्यांनी टिचणी बांधणी करून झाडांना मातीची भर द्यावी. केळीच्या मुख्य झाडाच्या खोडाच्या बाजूने उगवणारे नवीन झाड किंवा कोंब ज्याला बोलीभाषेत पिल्ले म्हणतात, त्यांना धारदार कोयत्याने नियमित काढावीत. रोगग्रस्त पाने कापून बागेबाहेर नष्ट करावीत, पण हिरवी पाने कापू नयेत.



झाडे पडू नयेत म्हणून गरजेप्रमाणे बांबूच्या काठ्या किंवा पॉलीप्रॉपीलीन पट्ट्यांनी झाडांना आधार द्यावा. २. केळी घडाची गुणवत्ता वाढविण्यासाठी काय करावे? घड पूर्ण निसवल्यावर केळफूल वेळीच कापावे. घडावर फक्त ८ ते ९ फण्या ठेवून खालच्या फण्या धारदार विळीने लवकर काढून टाकाव्यात. घड पूर्ण निसवल्यानंतर आणि त्यानंतर १५ दिवसांनी १० लिटर पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट, १०० ग्रॅम युरिया आणि १० मिली स्टीकर मिसळून फवारणी करावी. केळफुल कापल्यानंतर एकदा आणि त्यानंतर ३० दिवसांनी दुसऱ्यांदा १० लिटर पाण्यात २०० ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश मिसळून फवारणी करावी. घडांवर २% ते ६% सच्छिद्रतेच्या पांढऱ्या पॉलिथीन पिशव्यांचे आवरण करावे.

३. आंतरपिकांबाबतीत दक्षता केळीबागेत चवळी, उडीद, मुग, भुईमूग, काकडी, भोपळा, कलिंगड, खरबुज, मिरची आणि वांगी यांसारखी पिके घेणे टाळावे. ही पिके घेतल्यास सीएमव्ही रोग वाढण्याचा धोका वाढतो, त्यामुळे ही पिके लावू नयेत. ४. केळीसाठी आच्छादनाचा वापर केळीच्या दोन ओळींमधील मोकळ्या जागेच्या सुमारे ८०% भागावर ३० मायक्रॉन जाडीचे चंदेरी रंगाचे पॉलीइथिलीनचे आच्छादन करावे. हे आच्छादन आंतरमशागत पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात करणे योग्य असते. बदलत्या वातावरणात केळीचे व्यवस्थापन: १. अती व सतत पाऊस बागेत साचलेले पाणी लगेच बाहेर काढावे. जर सतत पावसामुळे जमिनीतून किंवा ठिबकाने खते देणे शक्य नसेल, तर खते पाण्यात मिसळून पानांवर फवारणी करावी. २. जोराचा वारा जोरदार वाऱ्यामुळे केळीची पाने फाटतात आणि झाडे पडून नुकसान होते. हे नुकसान कमी करण्यासाठी बागेभोवती दोन मीटर अंतरावर कुंपण पिकाच्या दोन ओळी लागवडीच्या वेळीच लावाव्यात. कुंपण पिकासाठी शेवरी या पिकाचा वापर करावा. ३. कमी तापमान थंडीच्या काळात रात्री झाडांना पाणी द्यावे. सकाळी लवकर बागेत ओला पाला आणि पाचोळा जाळून धूर करावा. झाडाच्या वयानुसार २५० ग्रॅम ते १००० ग्रॅम निंबोळी ढेप प्रती झाड द्यावी. थंडीपासून घडांचे संरक्षण करण्यासाठी सहा टक्के छिद्र असलेल्या पांढऱ्या प्लास्टिकच्या पिशवीचे आवरण करावे. ४. अतिजास्त तापमान उकाड्याच्या काळात झाडांना शिफारशीनुसार पुरेसे पाणी द्यावे.मातीतील ओलावा टिकवण्यासाठी बागेत केळीची पाने, गव्हाचा भुसा, ऊसाचे पाचट किंवा सोयाबीन भुसा वापरून सेंद्रिय आच्छादन करावे. एप्रिलपासून दर पंधरा दिवसांनी १० लिटर पाण्यात ८०० ग्रॅम केओलीन मिसळून केळीच्या पानांवर फवारणी करावी. वारंवार विचारले जाणारे प्रश्न १. केळी बागेत आंतरमशागत कधी आणि कशी करावी? लागवडीनंतर ३ ते ४ महिन्यांपर्यंत नियमित कुळवणी करून बाग स्वच्छ ठेवावी. २. केळीच्या घडाची गुणवत्ता वाढवण्यासाठी काय करावे? घडावर फक्त ८-९ फण्या ठेवून, फवारणी करून आणि पॉलिथीन आवरण लावून गुणवत्ता सुधारते. ३. केळी बागेत कोणती आंतरपिके घेऊ नयेत? चवळी, मुग, उडीद, भुईमूग, काकडी, कलिंगड, खरबुज, मिरची, वांगी टाळावीत कारण त्या सीएमव्ही रोग वाढवतात. ४. रोगग्रस्त पाने बागेतच ठेवावीत का? नाही, रोगग्रस्त पाने लगेच कापून बागेबाहेर नष्ट करावीत. ५. केळीच्या बागेत आच्छादन कधी करावे? नोव्हेंबर महिन्यात आंतरमशागत पूर्ण झाल्यानंतर ३० मायक्रॉन जाडीचे पॉलीइथिलीन आच्छादन करावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६३ : पुण्याच्या लाल महालावर अचानकपणे केलेल्या हल्ल्यात शिवाजीमहाराजांनी शाहिस्तेखानाची बोटे छाटली.
१६७९ : राजारामास पकडण्यासाठी झुल्फिकारखानाने रायगडास वेढा दिला असता राजाराम रायगडावरुन प्रतापगडास गेला. पुढे प्रतापगडासही शत्रूने वेढा दिल्यावर राजारामास पन्हाळगडावर जावे लागले.
१९३० : २४१ मैल प्रवास करुन महात्मा गांधी यांनी दांडीयात्रा संपविली.
१९४९ : भारत स्काऊट गाईडची स्थापना
१९५५ : प्रकृती अस्वास्थ्यामुळे विन्स्टन चर्चिल यांनी ब्रिटनच्या पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला.
१९५७ : कम्युनिस्ट पक्षाने भारतात प्रथमच केरळमध्ये निवडणूका जिंकल्या आणि इ. एम. एस. नंबुद्रीपाद हे केरळचे मुख्यमंत्री झाले.
२००० : अभिनेत्री सुलोचना यांच्या हस्ते डी. डी. १० या मराठी उपग्रह वाहिनीचे 'सह्याद्री' असे नामकरण करण्यात आले.
२००० : जळगाव नगरपालिकेच्या १७ माजली इमारतीचे उद्घाटन.
१९१९ : राष्ट्रीय समुद्री दिवस भारताच्या मालकीचं पहिलं जहाज एस.एस. लॉयल्टी लंडनला रवाना झालं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२७ : सर जोसेफ लिस्टर - निर्जंतुकीकरणामुळे जखमा लवकर बर्या होतात हे सिध्द करणारा ब्रिटिश शल्यविशारद (मृत्यू: १० फेब्रुवारी १९१२)
१८५६ : बुकर टी. वॉशिंग्टन - अमेरिकन निग्रोंच्या प्रश्नासाठी कार्य करणारे समाजसेवक, लेखक, वक्ते व शिक्षणतज्ञ (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९१५)
१९०८ : बाबू जगजीवनराम - स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, राजकारणी, केंद्रीय मंत्री व भारताचे उपपंतप्रधान (मृत्यू: ६ जुलै १९८६)
१९०९ : अल्बर्ट आर. ब्रोकोली - 'जेम्स बाँड' पटांचे निर्माते (मृत्यू: २७ जून १९९६)
१९१६ : ग्रेगरी पेक - हॉलीवूड अभिनेता (मृत्यू: १२ जून २००३)
१९२० : डॉ. रफिक झकारिया - महाराष्ट्राचे नगरविकासमंत्री आणि लोकसभा सदस्य (मृत्यू: ९ जुलै २००५)
१९२० : आर्थर हॅले - इंग्लिश कादंबरीकार (मृत्यू: २४ नोव्हेंबर २००४)
१९६६ : भारतीय-अमेरिकन अभिनेते आणि निर्माते आसिफ मांडवी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१७ : शंकरराव निकम - स्वातंत्र्यशाहीर
१९२२ : पंडिता रमाबाई - विधवा, परिक्त्यक्ता आणि स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारक आणि 'आर्य महिला समाज' च्या संस्थापिका, संस्कृत पंडित (जन्म: २३ एप्रिल १८५८)
१९४० : चार्लस फ्रिअरी तथा दीनबंधू अ‍ॅन्ड्र्यूज - इंग्लिश मिशनरी, महात्मा गांधींचे जवळचे मित्र, समाजसेवक आणि भारताच्या स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते (जन्म: १२ फेब्रुवारी १८७१)
१९६४ : गोपाळ विनायक भोंडे - नकलाकार
१९९३ : दिव्या भारती हिन्दी, तामिळ आणि तेलगु चित्रपट अभिनेत्री (जन्म: २५ फेब्रुवारी १९७४)
१९९६ : भालचंद्र नीळकंठ तथा बाबा पटवर्धन - बालगंधर्वांना पंधरा वर्षे साथ करणारे ऑर्गनवादक.
१९९८ : रुही बेर्डे - चित्रपट व नाट्य अभिनेत्री.
२००२ : मनोहर राजाराम तथा मनू छाबरिया - दुबईस्थित वादग्रस्त भारतीय उद्योगपती, जम्बो ग्रुपचे संचालक.

## पंचकल्याणी 'निली रावी' म्हैस; जाणून घ्या वैशिष्ट्ये!



या म्हशीच्या दोन वेगवेगळ्या प्रजाती आहेत का? तर हे खरं आहे. सुरुवातीला निली आणि रावी अशा दोन वेगवेगळ्या म्हशींच्या जाती होत्या. परंतु या दोन्ही जातीच्या म्हशीचं दिसणे आणि उत्पादनामध्ये जवळपास समानता आहेत. त्यामुळे त्यांच्यातील वेगळेपणा ठरवणे अवघड असल्यामुळे या म्हशींना निली रावी या नावाने एकच जात म्हणून मान्यता मिळाली. या म्हशींचा उगम पंजाबमधील फिरोजपुर, अमृतसर, गुरुदासपूर जिल्ह्यांमध्ये झाला आहे. दूध उत्पादनासाठी विशेषतः या जातींचा वापर केला जातो.

शरीर रचना : ही म्हैस मुऱ्हा जातीप्रमाणे मोठ्या आकाराची आहे. लांब तोंड, फुगीर कपाळ, विस्तारलेल्या नाकपुड्या, मुऱ्हा म्हशी सारखी वळलेली शिंग, लांब मान असते डोळे हे घारे असतात. शरीरावर पाच वेगवेगळ्या ठिकाणी पांढरे ठिपके. उदा. कपाळ, तोंड, नाकपुड्या. चारी पायांना सॉक्स घातल्यासारखा पांढरा रंग आढळतो. शेपटीचा गोंडा पांढरा. शरीरावरील पाच ठिकाणच्या पांढर्या ठिपक्यामुळे या जातीला पंचकल्याणी असेही म्हणतात. नवजात रेडकाचं वजन ३५ ते ४० किलो आणि प्रौढ म्हशीचं वजन ४५० ते ५५० किलो असते.

उत्पादकता : या म्हशीचे प्रथम माजावर येण्याचे वय अंदाजे ३६ महिने आहे. एका वेतात दूध देण्याचा कालावधी २७७ ते ३५५ दिवस असून १५०० ते २००० लिटर प्रति वेत दूध देते. दररोज साधारण ६ ते ९ लिटर दूध देते.

विशेष माहिती : या म्हशीचा एकूण जीवन काळ १२ ते १५ वर्षे एवढा असतो. केंद्रीय म्हैस संशोधन संस्था, हिसार, हरियाना येथे निली रावी म्हशीचं संवर्धन आणि संशोधन होते. पंजाबमध्ये नाभा या ठिकाणी संस्थेची उपशाखा आहे. फिलीपिन्स, इटली, हंगेरी, रोमानिया, ग्रीस, ब्राझील, बल्गेरिया देशांमध्ये त्यांच्या स्थानिक म्हशींच्या जाती सुधारणा कार्यक्रमामध्ये निली रावी जातीचा उपयोग केला जातो.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
रविवार दि. ०५ एप्रिल २०२६ ५



# गॅस एजन्सीचालकास मारहाण प्रकरणी डॉ. वरकड यांच्यासह तिघांविरुध्द गुन्हा दाखल

जालना। प्रतिनिधी

मंगल कार्यालय आणि हॉटेलसाठी गॅस सिलेंडर देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून गॅस एजन्सी चालकाला रुग्णालयात बोलावून शिवीगाळ व मारहाण करणारे वरकड हॉस्पीटलचे संचालक डॉ. रामेश्वर वरकड यांच्यासह तिघांविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, शिवम अजय पटवारी (वय २६, रा. जांगडा नगर, जालना) हे शांती गॅस एजन्सी आणि रिलायबल गॅस एजन्सीचे मालक असून, डॉ. रामेश्वर वरकड यांनी त्यांचे शौर्य हॉटेलसाठी गॅस सिलेंडरची मागणी केली होती. मात्र, शिवम यांच्या वडिलांनी सध्या फक्त मेडिकल आणि कॉलेजसाठी कमर्शियल गॅस पुरवठा सुरु असल्याचे सांगून हॉटेलसाठी गॅस सिलेंडर देण्यास असमर्थता दर्शवली.





या कारणावरुन संतापलेल्या डॉ. वरकड यांनी शिवमच्या वडिलांशी अरेरावीची भाषा केली. त्यानंतर रात्री ८ वाजेच्या सुमारास शिवम पटवारी यांना फोन करुन तुला माहीत नाही का मी कोण आहे, माझी ओळख मोठ्या लोकांशी आहे, अशी उध्दट भाषा वापरत धमकी देत चर्चेसाठी वरकड हॉस्पिटलमध्ये बोलावून घेतले. शिवम पटवारी हे त्यांचे चुलत भाऊ अमन पटवारी यांच्यासह रात्री ८.३० वाजता वरकड हॉस्पिटलमध्ये गेले असता, डॉक्टरांनी त्यांना कॅबिनमध्ये बोलावले. तिथे गेल्यावर डॉ. रामेश्वर वरकड, डॉ. सपकाळ आणि लक्ष्मण गव्हाणे या तिघांनी पटवारी बंधुंना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी शिवम आणि अमन हे तेथून बाहेर पडण्याचा प्रयत्नात असताना डॉ. वरकड आणि इतरांनी त्यांचा रस्ता अडवला. लक्ष्मण गव्हाणे यांनी शिवमला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून खाली पाडले याप्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला केल्यास तुझी गॅस एजन्सी बंद करून तुला गुंडांमार्फत जिवे मारुन टाकीन, अशी धमकी यावेळी डॉ. रामेश्वर वरकड यांनी दिल्याचे शिवम पटवारी यांच्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी डॉ. रामेश्वर वरकड, डॉ. सपकाळ आणि लक्ष्मण गव्हाणे या तिघांविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२६ (२), २९६, ११५ (२), ३५२, ३५१ (३) व ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

यासंदर्भात डॉ. रामेश्वर वरकड यांनी यावेळी बोलताना सांगितले आमच्याकडे आवश्यक तेवढे कायदेशिर मार्गाने घेतलेले गॅस सिलेंडर उपलब्ध असून, अलिकडच्या काळात आम्ही शांती गॅस एजन्सी अथवा रिलायबल गॅस एजन्सीकडे गॅस सिलेंडरची मागणी केलेलीच नाही. त्यामुळे श्री. पटवारी यांनी पोलिसात खोटी दिलेली आहे तक्रार निखालस खोटी आणि द्वेषपुर्ण आहे. काही दिवसापुर्वी तक्रारदार श्री. पटवारी यांच्या कुटूंबातील एक सदस्य वरकड हॉस्पीटलमध्ये दाखल होते. त्यावेळी बिल कमी करण्याबाबत सांगण्यात आले असता आपण त्यांची मागणी मान्य केली. तथापि, त्यांना ते मान्य नसावे आणि त्यातूनच मनात द्वेषभावना ठेवून श्री. पटवारी यांनीच मला फोनवर अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. तसेच स्वतःहून हॉस्पीटलमध्ये येवून आम्हालाच शिवीगाळ करीत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. दरम्यान, आपण याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दिली असून, वस्तुस्थिती मांडली आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे डॉ. वरकड यांनी सांगितले,

## देवगिरी पतसंस्थेच्या मॅनेजरसह कर्मचाऱ्याला बेदम मारहाण

अंबड। प्रतिनिधी

देवगिरी पतसंस्थेचे अंबड शाखा व्यवस्थापक कामकाज आटोपून सहकाऱ्यासह घरी जात असतांना अनोळखी चौघांनी त्यांना लाकडी दांडक्याने मारहाण केली. हा गंभीर प्रकार जालना-अंबड रोडवरील मठपिंपळगाव शिवारात घडला. कर्ज वसुलीच्या कारणावरून मारहाण झाली असल्याचे शक्यता असावे असे बोलले जात आहे. सदरील देवगिरी पतसंस्थेकडून नियमाचे उल्लंघन करून कर्मचाऱ्याकडून जास्तीचे काम करून घेत असल्याचे दिसून येत आहे यामुळे सदरील घटना घडण्याचे बोलल्या जात आहे.

याविषयी पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार विनोद तुकाराम कांबळे (वय ४९, रा. म्हाडा कॉलनी, जालना) हे अंबड येथील देवगिरी पतसंस्थेत शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. मार्च एन्डची गडबड असल्याने पतसंस्थेचे काम उशिरापर्यंत सुरु होते. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास काम आटोपून श्री. कांबळे हे सहकारी सुरेंद्र कल्याणकर यांच्यासोबत दुचाकीने (एमएच-२१ बीएस ४८८६) जालन्याकडे जात होते.

दरम्यान, सायंकाळी ५.४० वाजता ते मठपिंपळगाव येथील मत्स्योदरी शाळेजवळील स्पीड ब्रेकरजवळ आले असता, अचानक चार अनोळखी तरुण रस्त्यात आडवे आले आणि काहीही न बोलता त्यांनी श्री. कांबळे यांच्यासह श्री. कल्याणकर यांच्यावर लाकडी दांडक्याने हल्ला चढवला. हल्लेखोरांपैकी राखाडी शर्ट घातलेल्या एका तरुणाने श्री. कांबळे यांच्या डोक्यात दांडा मारुन त्यांना जखमी केले तर इतरांनी श्री. कल्याणकर यांच्या हात आणि पाठीवर मारहाण केली. या हल्ल्यात श्री. कांबळे हे चालत्या गाडीवरुन खाली कोसळल्याने गंभीर जखमी झाले. यावेळी रस्त्याने जाणाऱ्या एका प्रत्यक्षदर्शीने मध्यस्थीचा प्रयत्न केला असता, गर्दी होत असल्याचे पाहून हल्लेखोर २ दुचाकीवरुन (पल्सर आणि एचएफ डीलक्स) जालन्याच्या दिशेने पसार झाले. सध्या विनोद कांबळे यांच्यावर जालन्यातील एका खाजगी दवाखान्यात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी श्री. कांबळे यांच्या जबाबावरुन अंबड पोलीस ठाण्यात चौघा अज्ञात हल्लेखोरांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला

## मुकादम प्रदीप पालवे यांची तब्बल साडेसतरा लाख रुपयांची फसवणूक

### अंबड तांड्यावरील अनिल राठोड आरोपीस अटक तर दुसरा आरोपी आबा राठोड फरार

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील अकोला पालवेवाडी येथील उसतोडणी मुकादम प्रदीप बबन पालवे यांच्याकडुन आबासाहेब पंढरीनाथ राठोड याने दहा लाख तर अनिल पंडीत राठोड याने सात लाख पन्नास हजार रुपये उचल घेवुन उसतोडमी कामगार पुरविले नाहीत मुकादम प्रदीप पालवे यांनी राठोड यांनी फसवणुक केल्याची तक्रार केल्यानी पाथर्डी पोलिसांनी आबा राठोड व अनिल राठोड यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे अनिल पंडीत राठोड याला अटक करण्यात आली आहे येथील न्यायालयाने राठोड याला सोमवार (ता.६) पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत मुकादम प्रदीप पालवे यांनी आष्टी शुगर कारखाना ता.मोहोळ जि.सोलापूर येथे उसतोडणी

> मी सर्वसामान्य कुटुंबातील असून शेतीवाडी करून ऊसतोड मजूर विविध कारखान्यांना पुरवण्याचे काम करतो यासाठी आष्टी शुगर कारखाना ता.मोहोळ जि.सोलापूर येथे २०२४-२५ या वर्षी जालना अंबड येथील तांड्यावरील अनिल राठोड व आबा राठोड या बंधूंनी कारखान्यासाठी ऊसतोडमजूर टोळ्या पुरवतो यासाठी फोन पे आरटीजीएस व कॅश स्वरूपात तब्बल साडेसतरा लाख रुपये घेतले व ऊसतोड मजूर टोळ्या पुरवल्या नाही माझी फसवणूक झाल्याचे लक्षात आले नाही मी आबा राठोड व अनिल राठोड यांच्या विरोधात पाथर्डी पोलीस ठाण्यात कायदेशीर तक्रार दिली आहे आष्टी शुगर कारखान्याने थकीत पैशासाठी माझ्या शेतीवर बोजा चढवला आहे माझ्यावरील अन्याय दूर व्हावा व माझे पैसे परत मिळावे एवढीच माझी इच्छा आहे -प्रदीप पालवे,मुकादम पालवेवाडी अकोला

कामगार पुरविण्याचे काम घेतले होते सन २०२४-२५ या काळात आबासाहेब पंढरीनाथ राठोड अनिल पंडीत राठोड यांनी मुकादम प्रदीप पालवे याच्याकडुन उसतोडणी कामगार पुरवितो असे सांगुन सतरा लाख पन्नास हजार रुपये घेतले तसे नोटरी करारनामा करुनही दिले मात्र उसतोडणी कामगार पुरविले नाही प्रदीप पालवे यांचे दोन्ही राठोड बधुंनी पैसे घेवुन फसवणुक केली वेळोवेळी पैशाची मागणी करुनही पैसे परत दिले नाही त्यामुळे प्रदीप पालवे यांनी पाथर्डी पोलिसात फसवणुकीची तक्रार दाखल केली यातील संशयीत आरोपी अनिल पंडीत राठोड याचा शोध घेतला असता तो बीड जिल्ह्यातील मायंबा येथे देवदर्शनासाठी आल्याचे समजले पाथर्डी पोलिसांनी जालना जिल्ह्यातील अंबड येथे तांड्यावर जाऊन त्याला देवदर्शन करुन परतत असताना गाडीजवळ येताच ताब्यात घेतले आरोपी अनिल राठोड याने पोलिसांना विरोध केला पोलिसीनी कायदेशीर प्रक्रिया राबवून अनिल राठोड याला ताब्यात घेत अटक केली आहे प्रदीप पालवे यांची सतरा लाख पन्नास हजार रुपयाची फसवणुक केली या आरोपाखाली अनिल राठोड याला शुक्रवारी न्यायालयासमोर उभे केले न्यायालयाने अनिल राठोड याला ६ एप्रिल २०२६ पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

### केवळ अफवा तथ्यहीन आरोप?

जालना जिल्ह्यातील अंबड येथील तांड्यावरील अनिल राठोड व आबा राठोड हे आरोपी गुन्हेगारी वृत्तीचे असून यांनी अनेक मुकादमांना गंडवल्याची व आर्थिक फसवणूक केल्याची चर्चा आहे मुकादम प्रदीप पालवे यांचेच्याकडून साडेसतरा लाख रुपये घेऊन ऊसतोड मजूर टोळ्या पुरवतो असे सांगून राठोड बंधूंनी फसवणूक केली आहे यामध्ये अंबड येथील तांड्यावर पोलिसांना मारहाण केली व उसात लपून राहण्याची नामुष्की ओढावली अशा प्रकारच्या अफवा पसरवल्या जात आहेत यामध्ये कुठलेही तथ्य नाही असे पाथर्डी पोलीस ठाण्यातील अंबड येथील तांड्यावर राठोड बंधूवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी सांगितले आहे.

## विजेचा करंट लागून तरुणाचा मृत्यू

अंबड। प्रतिनिधी

अंबड येथील शुभम गणेश मूर्तडकर वय २७ या तरुणाचा अंबड तालुक्यातील शिरनेर येथे घराचे रंगरंगोटीचे काम करीत असताना विजेचा करंट लागून मृत्यु झाला. अंबड शहरातील इंदिरा नगर येथील युवक शुभम गणेश मुर्तडकर हा रंगरंगोटीचे पेंटर म्हणून काम करण्यासाठी शिरनेर येथे चुलता संतोष मुर्तडकर व चुलत भावासोबत गेला होता. रंगरंगोटीचे काम करत असताना तो पहिल्या मजल्यावरील पॅरापेट वॉल ला रंग देत असताना तो अचानक घरा समोर आलेल्या उच्च दाबाच्या विजेच्या तारा कडे त्यांचा हातातील लांब पाईप व ब्रशसह ओढल्या गेला. त्यानंतर त्याला उच्च दाबाच्या विजेचा शॉक लागला.



उपस्थित चुलते व चुलत भावाने त्याला अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ स्वप्नील पाटील यांनी त्यास तपासून मृत घोषित केले या प्रकरणी अंबड पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली. घटनेचा पंचनामा पोलिस अंमलदार संदीप कुटे, हिरामण फलटणकर व अमर तोडकर यांनी केला. वैद्यकीय अधिकारी डॉ. पाटील यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. मयत शुभम यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, पाच महिन्याची मुलगी, आई, वडील, बहिण, भाऊ असा परिवार आहे.

## भूमीअभिलेख कार्यालयातील सुनील साबळे व दिनेश पुसदकर यांच्यावरील कारवाई टाळण्यासाठी लपंडाव ?

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील पीडित शेतकरी पांडुरंग मायनजी घुले व त्यांचे दोन मुलं हरी पांडुरंग घुले वसंत पांडुरंग घुले या बंधूंच्या शेतजमीन गट नंबर ४२४ ४२५ व ३९१ शेतजमिनीत (वहिवाट आणि बांध) सामनेवाले एकनाथ घुले यांच्यात शेतजमीनमोजणी वरून वाद आहे यासंदर्भात पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपअधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर सुनील साळवे यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वसंत घुले आणि हरी घुले यांच्या शेतजमिनीमध्ये एकनाथ घुले यांनी वहिवाटीत अतिक्रमण केले असल्याची तक्रार थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे.

बनावट दस्तावेज तयार करून मोजणीत फेरफार केल्याप्रकरणी पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन कर्मचारी निखिल मोरे व विद्यमान कर्मचारी दिनेश पुसदकर व सुनील साबळे यांचे निलंबन करण्याची मागणी करूनही अद्यापही अहिल्यानगर भूमिअभिलेख जिल्हा अधीक्षक संजय कुंभार हे भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पूसदकर व सुनील साबळे यांच्यावरील कारवाई टाळण्यासाठी लपंडाव खेळत असल्याचे दिसत आहे. पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपाधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने भालगाव येथील शेतकरी पांडुरंग मायनजी घुले त्यांचे मुलं वसंत घुले व हरी घुले यांच्या शेतजमीन गटनंबर ३९१ ४२४ व ४२५ जमीन मोजणीमध्ये २०/१२/२०२४ २०/०६/२०२५ तारखेला केलेल्या हद्दीखुणा २०/३/२०२६ रोजी केलेल्या हद्दीखुणा गट नंबर ३९१ मध्ये कायम मोजणी सीट व पोटहिस्सा यामध्ये सुद्धा प्रचंड तफावत जाणवत आहे.

> महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे अप्पर सचिव विकास खारगे भूमिअभिलेख उपसंचालक महेश इंगळे अहिल्या नगर जिल्हा भूमी अधीक्षक संजय कुंभार यांच्याकडे पाथर्डी भूमिअभिलेख कार्यालयातील भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साबळे यांची खातेनिहाय चौकशी लावून त्यांना निलंबित करण्याची मागणी आहे.
>
> पांडुरंग मायनजी घुले
> – पीडित शेतकरी भालगाव

### जाहिरनामा

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३५०/२०२६**
**पद्मिनबाई दिवे व इतर वि. निरंक**
**विधीज्ञ बी. बी. लटपटे**

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) पद्मिनबाई भ्र. दगडु दिवे, वय ७४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. आहेर धानोरा ता.जि.बीड २) सुमनबाई भ्र. दगडु उर्फ दगडोराव दिवे, वय ७७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर ३) बंडु पि. दगडुराव दिवे, वय- ५१ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ४) मंदाकिनी भ्र. विठ्ठलराव लाखुटे, वय- ५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर ५) अरुणाबाई भ्र. लक्ष्मण इंगोले, वय- ५५ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

६) उर्मिला भ्र. रघुनाथ इंगोले, वय- ५३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे ज्याअर्थी मयत नामे दगडु पि.आबाजी दिवे हे दिनांक २७/०६/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ व २ हया मयताच्या पत्नी असून अर्जदार क. ३ हा मयताचा मुलगा आहे तसेच अर्जदार क. ४ ते ६ हया मयताच्या विवाहित मुली आहेत.

अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत. मयत नामे दगड्डु पि. आबाजी दिवे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत दगडु पि. आबाजी दिवे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १६/०४/२०२६ आहे.

आज दिनांक १०/३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित
क. लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड

आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

### जाहिर प्रगटन

**मा. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक, १२२/२०२६**
**तात्या व ईतर विरुध्द निरंक**
**श्री.व्ही. एन. मस्के**

ज्यापेक्षा शिवाजी पि. आत्माराम पेचे, हे दिनांक १८/०२/२०२६ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

१. तात्या पि. शिवाजी पेचे, वय ३४ वर्षे, धंदा शेती, २. दिपक पि. शिवाजी पेचे, वय २५ वर्षे, धंदा शेती, ३. संगिता भ्र. दादासाहेब शेटे, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, ४. रोहिणी भ्र. शिवाजी टेकाळे, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, ५ आशाबाई भ्र. शिवाजी पेचे, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, ६. लक्ष्मीबाई भ्र. आत्माराम पेचे, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र १,२, ४ ते ६ यांचा पत्ता रा. सौताडा, ता. पाटोदा जि. बीड अर्जदार क्र ३ यांचा पत्ता रा पांढरी, ता. आष्टी, जि. बीड ज्याअर्थी, अर्जदार क्र १ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र ३ व ४ हया मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्र ५ ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र ६ ही मयताची आई आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत शिवाजी पि. आत्माराम पेचे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक. ०२/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पु.ता.०७/०५/२०२६

स्वाक्षरित
क. लिपीक
सह दिवाणी न्यायालय क स्तर पाटोदा

आदेशावरुन
स्वाक्षरित
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर पाटोदा

### जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र/४७६/२०२६**
**रंजनाबाई वि. निरंक**

अर्जदार : १ रंजनाबाई हनुमान साबळे, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. धानोरा रोड, ता. जि. बीड. २ हनुमान फालाजी साबळे, वय ५६ वर्षे, रा. धानोरा रोड, ता. जि. बीड. ३ अश्वीनी विशाल साबळे, वय ३२ वर्षे, रा. धानोरा रोड, ता. जि. बीड. ४ आयुष विशाल साबळे अ.पा.क आई अर्जदार क्र. ३, वय १५ वर्षे, घदां शिक्षण रा. वरीलप्रमाणे ५ सम्यक विशाल साबळे अ.पा.क आई अर्जदार क्र.३ वय १२ वर्षे, घदां शिक्षण रा. वरीलप्रमाणे

गैरअर्जदार विरुध्द निरंक

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत विशाल हनुमान साबळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी विशाल हनुमान साबळे यांचे दिनांक १५.११.२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय ता. जि. बीड येथे मयत झालेले असून अर्जदार मयताचे वारस आहेत. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत विशाल हनुमान साबळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४ माहे ०४ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १२ / ०६/२०२६ आहे.

आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड



जालना : जिल्हा स्त्री रुग्णालय येथे जालना मिशन न्यूट्रिशन या प्रशिक्षण सत्रात जिल्हाधिकारी अशीमा मित्तल तसेच जिल्हा परिषद जालना च्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी एम मिनू यांनी प्रशिक्षणास भेट दिली तसेच सर्व प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले तसेच त्यांनी प्रशिक्षण घेऊन ते रुग्णांना त्याचा लाभ होईल याची काळजी घेणे बाबत आवाहन केले तसेच जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयात विविध विभागांची पाहणी केली

# बीड जिल्ह्याचा 'मिशन साथी' स्तुत्य उपक्रम -डॉ.नीलम गोऱ्हे

## गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात पुर्नगठीत समितीची पहिली बैठक

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद बीड मार्फत स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या आरोग्य विषयक समस्यांकरिता प्रायोगिक तत्त्वावर 'मिशन साथी' हा स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत आरोग्य विभागामार्फत 'आरोग्यसाथी' उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. ऊसतोड कामगारांची माहिती संकलित करण्यासोबतच त्यांच्या आरोग्य तपासणीसाठी जिल्हा, तालुका व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर समन्वय अधिकारी नियुक्त करण्यात आले. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात ७७० आरोग्य साथी असून त्यापैकी ४४६ चे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. अशा प्रकारचे उपक्रम इतर जिल्ह्याने राबवावेत अशा सूचना डॉक्टर नीलम गोरे यांनी केल्या.

राज्यशासनाने गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात राज्यस्तरीय समिती पुर्नगठीत करण्यात आली आहे, या समितीचे कामकाज अधिक गतीने तसेच प्रभावीपणे होण्यासाठी लवकरात लवकर जिल्हास्तरीय समित्यांच्या कामाचे स्वरूप लवकरच ठरवण्याचा निर्णय विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी घेतला.. ऊसतोड महिला कामगारांमध्ये आरोग्य विषयी व्यापक स्वरूपात जनजागृती करावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात यावे, असेही निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी दिले.



पुणे विधान भवन येथील झुंबर सभागृह येथे गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात स्थापित राज्य समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी आमदार डॉ. मनीषा कायंदे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) तर आमदार नमिता मुंदडा, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य सेवा अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांचे प्रमुख, समिती सदस्या डॉ. संगीता चव्हाण, युनिसेफचे आरोग्य तज्ज्ञ डॉ. मंगेश गढरी यांच्यासह तसेच समितीचे सदस्य उपस्थित होते. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, जिल्हस्तरीय समितीमार्फत मागील ३ वर्षातील राज्यातील ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य विषयक समस्यांबाबत तपासणी करावी. खाजगी रुग्णालयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांबाबत तपासणी करावी. रुग्णालयामार्फत अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत किंवा कसे या बाबतीत तपास करणे. अनावश्यक शस्त्रक्रियांवर प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना सुचविणे आणि या समितीच्या वर्षातून कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करावे. शासन ऊसतोड महिला कामगाराचे जीवनमान अधिक सुखकर करण्याकरिता प्रयत्नशील आहे. आरोग्य विभागाच्यावतीने सुमारे एक लाख ऊसतोड महिला पान २ वर

# नेकनुर पोलिसांपुढे चोरट्यांचे आव्हान पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश गावात ग्रामपंचायतीमार्फत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील विहिरीच्या मोटारीची विद्युत वायर गेल्या दीड महिन्यात तब्बल दोन वेळा चोरीला गेल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावाच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या या



योजनेवर परिणाम होत असून पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या वारंवार होणाऱ्या चोरीमुळे ग्रामपंचायतीवर मोठा आर्थिक बोजा पडत असून आतापर्यंत सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सरपंच बालासाहेब जाधव यांनी दिली. यापूर्वी झालेल्या चोरीबाबत नेकनुर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, पुन्हा चोरी झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी पान २ वर

# ३५३ चा गुन्हा दाखल करण्याची धमकी

## अंबेवेस पुलाच्या शुभारंभावरून नगरसेवक नितीन बागवाले आक्रमक

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

अंबेवेस परिसरातील जुन्या पुलाच्या पुनर्निर्माणासाठी आज शुभारंभ करण्यात आला असला, तरी या कामाच्या पद्धतीवर नगर परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते तथा नगरसेवक नितीन बागवाले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार न करता घाईघाईत शुभारंभ करण्यात



आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

अंबेवेस येथील पूल हा प्रभाग क्रमांक १६ मधील अत्यंत महत्त्वाचा वाहतूक दुवा असून, या भागातील नागरिकांना दररोज ये-जा करण्यासाठी याच पुलाचा आधार आहे. त्यामुळे जुना पूल पाडण्यापूर्वी नागरिकांसाठी पर्यायी पुलाची व्यवस्था करणे अत्यावश्यक पान २ वर

# चिंचोली येथे १० एप्रिलपासून ४८ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**नामवंत कीर्तनकारांची मांदियाळी**

पाटोदा । प्रतिनिधी

श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या आशीर्वादाने आणि वैकुंठवासी नारायण महाराज कुंभार यांनी प्रस्थापित केलेल्या परंपरेनुसार, श्री क्षेत्र जुना गहिनीनाथगड, चिंचोली (ता. पाटोदा, जि. बीड) येथे ४८ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा १० एप्रिल ते १७ एप्रिल २०२६ या कालावधीत श्री गहिनीनाथ संजीवन समाधी मंदिरात पार पडणार आहे.

या सप्ताहाला श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे श्री महंत विठ्ठल महाराज आणि भगवान गडाचे व्याख्यानाचार्य डॉ. श्री महंत नामदेव महाराज शास्त्री यांचे विशेष आशीर्वाद लाभणार आहेत.

अशी असेल कीर्तन सेवा (रात्री ९ ते ११):

सप्ताहामध्ये दररोज रात्री नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होतील. यामध्ये १० एप्रिल रोजी श्री अमृताश्रम महाराज जोशी, ११ एप्रिल रोजी श्री कृष्णा महाराज चवरे (पंढरपूर), १२ एप्रिल रोजी श्री माऊली महाराज पठाडे (कर्जत), १३ एप्रिल रोजी श्री उमेश महाराज दशरथे (आळंदी), १४ एप्रिल रोजी श्री सोपान महाराज सानप (हिंगोली), १५ एप्रिल रोजी श्री ज्ञानेश्वर महाराज जळकेकर (जळगाव) आणि १६ एप्रिल रोजी भगवान गडाचे उत्तराधिकारी श्री कृष्णा महाराज शास्त्री यांची कीर्तने होतील.

काल्याचे कीर्तन आणि महाप्रसाद:

सप्ताहाची सांगता शुक्रवार, १७ एप्रिल पान २ वर

# अंबाजोगाई पिपल्स बँकेची ऐतिहासिक भरारी

## १०३२ कोटींचा व्यवसाय अन् शून्य टक्के एनपीए

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये १०३२ कोटी रुपयांचा एकूण बँकिंग व्यवसाय पूर्ण करून सहकार क्षेत्रात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने ६६५ कोटींच्या ठेवी जमा केल्या असून ५ कोटी २६ लक्ष रुपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे. अत्यंत शिस्तबद्ध आर्थिक नियोजनामुळे बँकेने 'शून्य टक्के' नेट एनपीए राखण्यात अभूतपूर्व यश मिळवल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. महाराष्ट्रभरातील पान २ वर

# अनोळखी पुरुष प्रेताची ओळख पटविण्याचे पोलीसांकडुन नागरीकांना आवाहन

माजलगाव । प्रतिनिधी

केसापुरी कॅम्प येथील चुंबडे यांचे घराच्या पाठीमागे माजलगाव धरणाच्या कडेला दिनांक ०३ एप्रिल शुक्रवार रोजी सकाळी ०९:०० वाजण्याच्या सुमारास पाण्यात एक पुरुष जातीचे पालथ्या व बेशुध्द अवस्थेत ईसम मिळून आला त्याचे वर्णन खालील प्रमाणे एक अनोळखी ईसम नाव गाव माहीत नाही वय अंदाजे ४० वर्ष अंगावर निळ्या रंगाचे-टि शर्ट ज्यावरती पांढरे ठिपके असलेला व डाव्या छातीवर इंग्रजीत असे लोगो असलेले



तसेच काळी पॅन्ट, व उजव्या हाताला लाल रंगाचा दोरा बांधलेला त्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्या जवळ इंग्रजीत असे गोंदलेले असून, केस काळे पांढरे, चेहरा - गोल व सुजलेला व चेहर्याची कातडी निघालेली, नाक-चपटे मिशा काळे बारीक, ओठ-जाड व जिभ अर्धवट बाहेर आलेली. दोन्ही हाताचे कातडी निघालेली तसेच पोट फुगलेले व पोटावरची कातडी निघालेली तसेच दोन्ही पाय पान २ वर

# महात्मा फुले यांचे जन्मशताब्दी वर्ष 'महात्मा फुले कार्य गौरव वर्ष' म्हणून साजरे करावे - ॲड.राऊत

बीड । प्रतिनिधी

आधुनिक भारताच्या सामाजिक क्रांतीचे अग्रदूत आणि थोर समाज सुधारक महात्मा जोतीराव फुले यांचे २०० वे जन्मशताब्दी वर्ष 'महात्मा फुले कार्य गौरव वर्ष' समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली म्हणून साजरे करण्यात येणार आहे. राज्यातील विविध विभाग, जिल्हा, तालुका आणि गाव स्तरावर विविध सामाजिक, प्रबोधनात्मक, समाज जागृतीपर कार्यक्रम राबवून 'महात्मा फुले कार्य गौरव वर्ष' प्रत्येक समता सैनिकांनी साजरे करावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.



या अनुषंगाने शासनाने गठित केलेल्या समितीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नुकतीच बैठक पार पडली आहे. या बैठकीत उपस्थित राहून ना. छगनराव भुजबळ साहेब यांनी जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यभरात राबविण्यासाठी विविध उपक्रम सुचविले आहेत. यामध्ये पुणे येथील फुलेवाडा आणि सावित्रीबाई फुले स्मारकाचे विस्तारीकरण करण्यासाठी रेंगाळलेले भूसंपादनाचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे. तसेच भिडेवाडा येथील राष्ट्रीय स्मारकाचे काम पूर्ण करून ते राष्ट्राला अर्पण करण्यात यावे. नायगाव, कटगुण यांसह सत्यशोधक समाजाशी संबंधित स्थळांचा ऐतिहासिक विकास करण्यात यावा. सामाजिक न्याय, शिक्षण, स्त्री सबलीकरण, शेती व संविधानिक मूल्यांवर आधारित राज्यस्तरीय 'महात्मा फुले विचार संमेलन' व परिसंवादांचे आयोजन करण्यात यावे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये विशेष उपक्रम राबविण्यात यावेत आणि शाळा - महाविद्यालयांमध्ये व्याख्यानमाला, निबंध, वक्तृत्व व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. महात्मा फुले यांच्या विचारांवर आधारित अभ्यासक्रम, संशोधन प्रकल्प, फेलोशिप आणि विशेष शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात याव्यात. राज्यभर 'महात्मा फुले विचार रथ', लोककला, पथनाट्य आणि डिजिटल माध्यमांतून सामाजिक प्रबोधन करण्यात यावे. महात्मा फुले यांच्या साहित्याचे नव्याने प्रकाशन, अनुवाद, डिजिटल संग्रहालय निर्मिती आणि त्यांच्या वाङ्मयाच्या जास्तीत जास्त प्रती वितरणासाठी उपलब्ध पान २ वर

# गेवराई तालुक्यात भगवे वादळ निर्माण होणार - संपर्कप्रमुख मनोज शिंदे

गेवराई । प्रतिनिधी

शिवसैनिकांच्या जोरावर गेवराईसह जिल्ह्यात भगवा अधिक उंचावणार असून प्रत्येक गावात शिवसेनेचे मजबूत जाळे उभे करु. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आगामी निवडणुकीसाठी जिल्ह्यात शिवसैनिकांचे संघटन अधिक मजबुत करणार आहे. शिवसैनिकांनी जनतेच्या प्रश्नावर तत्परतेने काम करुन शिवसेनेची ओळख अधिक मजबुत करावी, असे प्रतिपादन बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांनी केले. तर शिवसेना हा केवळ पक्ष नसून जनतेशी जोडलेली चळवळ असल्याचे प्रतिपादन मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी केले.




गेवराईमध्ये तालुका संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

गेवराई मध्ये मुकेश आण्णा महाजन यांच्या शिवसेना तालुका संपर्क मध्यवर्ती कार्यालयाचे उदघाटन व गेवराई शहरांमध्ये शाखा ऊध्दघाटन सोहळा संपन्न झाला

गेवराई या ऊध्दघाटन सोहळा प्रसंगी बीड संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे साहेब, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख श्री चंद्रकांत आप्पा नवले शिवसेन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, मराठवाडा निरीक्षक युवासेना श्री. अविनाश जाधव, बीड जिल्हा शिवसेनासंघटक श्री. विक्रमराजे भोसले, युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे , युवासेना जिल्हाप्रमुख श्री. सुमीत कोळपे, पान २ वर

# डिजिटल अरेस्ट गुन्ह्यातील तीन संशयित आरोपींचा जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

डिजिटल अरेस्ट/सायबर गुन्ह्यातील तीन संशयित आरोपींची जामीन अर्ज दिनांक ०४ एप्रिल २०२६ रोजी सहावे मुख्य न्याय दंडाधिकारी बीड यांच्या न्यायालयासमोर मांडण्यात आला. दिनांक २४ मार्च २०२६ रोजी सायबर पोलीस स्टेशन बीड गु. र. नं १०/२०२६ या प्रकरणामध्ये परळी येथील सूर्यकांत निवृत्ती राव मुंडे यांची तब्बल २३ लाख ४२ हजार ८८८ रुपयांची फसवणूक अज्ञात आरोपीने केली होती. त्यामुळे भा. न्या. सं. कलम ३१९(२),३१८(४),३३६(३),३४०(२),३(५) व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० नुसार कलम ६६ व कलम ६६() नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. संशयित आरोपींना दिनांक २८.०३.२०२६ रोजी जळगाव येथून सायबर पोलिसांकडून अटक करण्यात आली होती.



पुढे ६ वे मा.मुख्य दंडाधिकारी बीड येथे सदरील गुन्ह्यातील संशयित तीन आरोपीचा जामीन अर्ज दाखल करून दोन्ही बाजू मा.न्यायालयाने ऐकून घेऊन डिजिटल अरेस्ट/सायबर गुन्ह्यातील तिन्ही आरोपींची जामीन सायबर विधीज्ञ ॲड. किशोर खेडकर यांनी प्रभावी कायदेशीर भक्कम बाजू मांडून, सखोल अभ्यासासह, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदीचा योग्य वापर करत संशयित तिन्ही आरोपींना दिनांक ४ एप्रिल२०२६ रोजी जामीन मिळवून दिला. या कायदेशीर कामासाठी ॲड. किशोर खेडकर यांना ॲड. ए. एन. बारगजे व ॲड. एस. ए. चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन व ॲड. बी. एन. झीने, ॲड. ए. आबुज, ॲड. विलास ढाकणे, ॲड. सुनील आंधळे व ॲड. बालाजी विघ्ने यांनी सहकार्य केले.

# आदित्य शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्याची उत्तुंग भरारी; एकाच वर्षात दोन पदांवर निवड

बीड । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात नामांकित असलेल्या आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी शाखेचा माजी विद्यार्थी अजय श्रीराम गिरी याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एकाच वर्षात दोन महत्त्वपूर्ण पदांवर निवड मिळवून शाखेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. अजयची स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये () ज्युनिअर असोसिएट आणि कस्टमर सर्व्हिस असोसिएट या महत्वाच्या पदांसाठी निवड




झाली आहे. या यशाबद्दल या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी अभीनंदन केले.

बँकिंग क्षेत्रातील नामांकित समजल्या जाणाऱ्या आयबीपीएस मार्फत ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षा पान २ वर

### विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय

यशस्वी आणि सक्षम विद्यार्थी घडवणे हेच आमच्या संस्थेचे मुख्य ध्येय आहे. आदित्य महाविद्यालयात राबवले जाणारे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि तज्ज्ञांच्या व्याख्यानांमुळेच आज आमचे विद्यार्थी विविध क्षेत्रांत अधिकारी म्हणून कार्यरत होत आहेत- डॉ. आदिती सारडा, संचालिका, आदित्य शिक्षण संस्था.

### योग्य मार्गदर्शनामुळेच यश मिळाले

आदित्य कृषी महाविद्यालयातील सकारात्मक वातावरण आणि शिक्षकांनी दिलेल्या स्पर्धा परीक्षेच्या मार्गदर्शनामुळेच मी हे यश मिळवू शकलो. सातत्यपूर्ण सराव आणि योग्य दिशा मिळाल्यास यश नक्की मिळते. या यशाचे श्रेय माझे आई- वडील आणि महाविद्यालयाला जाते. -अजय गिरी, यशस्वी विद्यार्थी.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अवकाळीचा फटका अन् प्रशासनाला जाग; नदी-नाल्यांलगतची अनधिकृत बांधकामे हटवणार

**पुणे । प्रतिनिधी**

गुरुवारच्या अवकाळी पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीनंतर, अशा घटनांना आळा घालण्यासाठी नदी-नाल्यांलगतच्या अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करून आवश्यक बांधकामे तातडीने हटविणार असल्याची माहिती महापौर मंजुषा नागपुरे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. पालिका आयुक्त नवल किशोर राम यावेळी उपस्थित होते.

अवकाळीने शहराला झोडपल्यानंतर पूरस्थिती, झाडपडीच्या घटना तसेच नुकसानग्रस्तांना मदत देण्यासाठी महापौरांनी सर्व विभाग प्रमुखांची बैठक बोलावली होती. त्यानंतर पत्रकार परिषदेत ही दिली. पावसामुळे नुकसान झालेल्या नागरिकांचे पंचनामे करून त्याबाबत जिल्हा प्रशासनास कळविण्यात येणार आहे. तसेच शासनाकडून मदत न मिळाल्यास पालिकेच्या माध्यमातून मदत देण्याचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्याचे महापौरांनी स्पष्ट केले.अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, रस्ते विभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर, प्रकल्प विभाग प्रमुख जगदीश खानोरे, उपायुक्त माधव





जगताप यावेळी उपस्थित होते. पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई, चेंबर सफाई तसेच पावसाळी वाहिन्यांच्या स्वच्छतेची कामे येत्या सोमवारपासून सुरू करण्यात येणार आहेत. यासाठीची निविदा प्रक्रिया परिमंडळ उपायुक्तांकडून सुरू झाली असून, त्यानुसार कमी दराच्या निविदा सादर करणाऱ्या ठेकेदारांना थेट काम करण्याच्या सूचना दिल्याचे महापौरांनी स्पष्ट केले. तसेच १५ मेपर्यंत ही कामे कोणत्याही परिस्थितीत पूर्ण केली जाणार असून, पुढील महिनाभर सर्व क्षेत्रीय कार्यालयांची पथके तसेच अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन कामांचा नियमित आढावा घेतील. याशिवाय पावसाळी वाहिन्यांची क्षमता वाढविण्यासाठी अंदाजपत्रकात निधी वाढवून देण्याचे नियोजन असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

१२१ ठिकाणी तातडीची कामे

शहरात पावसाळ्यात २४० ठिकाणी पाणी साचते. त्यापैकी २२७ ठिकाणी गुरुवारच्या अवकाळीने पाणी साचले होते. या ठिकाणांपैकी ४९ ठिकाणी अवघ्या १० ते १२ मिनिटांत पाण्याचा निचरा करण्यात प्रशासनाला यश आले. मात्र, १२१ ठिकाणी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याने या भागांत सोमवारपासून कामे सुरू करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. त्यात प्रामुख्याने पाण्याचा निचरा सुधारण्यासाठीच्या उपायांचा समावेश असेल.

पालिका देणार मदत

गुरुवारी नवशा मारुती मंदिराजवळ झाड कोसळल्याने एका महिलेचा मृत्यू झाला. तसेच अनेक भागांमध्ये घरांमध्ये पाणी शिरले. या घटनांचे पंचनामे करून मृत महिलेच्या कुटुंबीयांना मदत मिळावी यासाठी महसूल विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. शासनाकडून मिळणारी मदत पाच लाख रुपये असून, पालिका दोन लाखांची मदत देणार आहे. तसेच शासनाकडून मदत न मिळाल्यास पालिका पाच लाखांची मदत देणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

## प्रवासी घेण्यावरुन रिक्षाचालक भिडले; थेट डोक्यात घातला सिमेंटचा गट्टू



**पुणे । प्रतिनिधी**

प्रवासी घेण्यावरून झालेल्या वादातून रिक्षाचालकांमध्ये झालेल्या मारामारीत एकजण जखमी झाला. या प्रकरणी रिक्षा चालकांसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कात्रज परिसरातील घटनेत रिक्षा चालकाच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालण्यात आला. शेखर गोविंद पुजारी ( ४९, रा. घुंगरवाली चाळ, संतोषनगर, कात्रज ) हा रिक्षाचालक जखमी झाला आहे.


या प्रकरणी कुणाल कांबळे (रा. बिबवेवाडी), एस. मिसाळ उर्फ टायगर यांच्यासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पुजारी यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून त्यानुसार रिक्षाचालक पुजारी हे कात्रज परिसरात थांबले होते. त्या वेळी रिक्षात प्रवासी भरण्यावरुन त्यांचा आरोपींशी वाद झाला. वादातून आरोपींनी पुजारी यांना शिवीगाळ करुन मारहाण केली.

## आजोबाच झाला हैवान, 'ते' भूत डोक्यात गेलं आणि ६ वर्षांच्या नातीसह २ जणांची हत्या केली ! आळंदीतील ठाकरवस्ती परिसरात झालेल्या दुहेरी हत्याकांडाचा अखेर उलगडा

**पुणे । प्रतिनिधी**

आळंदीतील ठाकरवस्ती परिसरात झालेल्या दुहेरी हत्याकांडाचा अखेर उलगडा झाला आहे. येथील एका ६ वर्षांच्या चिमुकलीचा आणि तिला सांभाळणाऱ्या ७० वर्षांच्या वृद्धेचा गळा आवळून आणि डोक्यात दगड घालून खून करण्यात आला होता. धक्कादायक बाब म्हणजे मुलीच्या सावत्र आजोबानेच हा खून केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेने अत्यंत वेगाने तपास चक्रे फिरवत आरोपी विनायक तुकाराम भवारी याला अवघ्या काही तासांत आळेफाटा येथून बेड्या ठोकल्या आहेत.

या प्रकरणातील मुख्य आरोपी विनायक भवारी याचे संगीता केदारी यांच्याशी दोन वर्षांपूर्वी



फेसबुकच्या माध्यमातून ओळख होऊन प्रेमविवाह झाला होता. मात्र, गेल्या काही काळापासून त्यांच्यात वाद असल्याने विनायक वेगळा राहत होता. शेजारी राहणाऱ्या ७० वर्षांच्या मंगल शिंदे या पत्नी संगिताला आपल्याविरुद्ध भडकवतात, असा संशय विनायकच्या मनात होता. याच रागातून १ एप्रिल २०२६ च्या रात्री जेव्हा संगीता हॉस्पिटलमध्ये कामावर गेल्या होत्या, तेव्हा विनायकने संधी साधली. त्याने प्रथम मंगल शिंदे यांची हत्या केली आणि त्यानंतर आपली ओळख पटेल या भीतीने, निष्पाप ६ वर्षांच्या धनश्रीचाही गळा आवळून खून केला. संगीता केदारी या गुरुवारी सकाळी आपल्या नातीला घरी नेण्यासाठी मंगल शिंदे यांच्या घरात गेल्या असता, त्यांना दोघी मृतावस्थेत पडल्याचे दिसले. या घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी संशयित विनायकचा शोध सुरू केला. तो आळेफाटा परिसरात पळून गेल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी तिथे सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. मयत धनश्रीची कहाणी अत्यंत दुःखद आहे. तिच्या वडिलांचे आणि काकांचे आधीच निधन झाले होते, तर तिची आई तिला सोडून निघून गेली होती. अशा परिस्थितीत तिची आजी संगीता केदारी या तिचा जीव लावून सांभाळ करत होत्या.

## पिंपरी चिंचवडमध्ये ५ नवीन पोलीस ठाणे



**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यासह पिंपरी चिंचवड शहरामध्ये गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत आहे. ही वाढती गुन्हेगारी रोखण्याचे, नागरिकांना भयमुक्त करण्याचे मोठे आव्हान पोलीस प्रशासनासमोर आहे. एकीकडे शहराचा झपाट्याने विकास होत असतानाच वाढती गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी पोलीस आयुक्तालयाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नव्याने पाच पोलिस ठाण्याचा समावेश होणार आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नव्याने पाच पोलिस ठाण्याचा समावेश होणार आहे, पिरंगुट, जांबे, पिंपळे सौदागर, मोशी, आणि देहूरोड या पाच पोलिस ठाण्यासाठी पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पोलिस महासंचालक कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवला आहे. त्यामुळे पुढील काळात पोलिस ठाण्याची संख्या ही २३ वरून २८ वर जाणार आहे.

या नवीन पोलीस ठाण्यांमुळे काही नव्याने देखील पदे निर्माण होणार आहेत, यात परिमंडळ ४ साठी ११ पदे, पिरंगुट पोलिस ठाणे १९०, जांबे पोलिस ठाणे १८९, पिंपळे सौदागर पोलिस ठाणे १८३, मोशी पोलिस ठाणे १९४ , देहुगाव पोलीस ठाणे १९४ अशी एकूण ९६१ पदे नव्याने पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयासाठी निर्मित केली जाणार आहेत.

## माऊलींच्या पालखी सोहळ्यावर अचानक मधमाश्यांचा हल्ला ! गोंधळ, भिती, भाविकांची धावपळ, ६५ जण जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या राजगड तालुक्यातील विहीर गावात अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित पालखी सोहळ्यावर अचानक मधमाश्यांनी हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात मधमाशांनी चावा घेतल्याने ६५ हून अधिक ग्रामस्थ जखमी झाले. सर्व जखमींवर राजगडमधील वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. या धक्कादायक घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, राजगड तालुक्यातील विहीर गावात अखंड हरिनाम सप्ताह सुरु होता. शुक्रवारी या अखंड हरिनाम सप्ताहाचा सांगता समारंभ सुरू होता. त्यानिमित्त ज्ञानेश्वर माऊलींच्या प्रतिमेची पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. या सप्ताह सोहळ्यासाठी आणि पालखीच्या दर्शनासाठी आसपासच्या भागातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. विठुनामाच्या गजरात ही पालखीची मिरवणूक सुरु होती. अशातच पालखी मंदिराजवळ आल्यानंतर ती जमिनीवर ठेवताच अचानक मधमाशांनी उपस्थितांवर हल्ला चढवला.




अचानक झालेल्या या हल्ल्याने नागरिकांची एकच तारांबळ उडाली. लोक वाट मिळेल तिकडे सैरावैरा धावू लागले. काहींनी मंदिरात आश्रय घेतला तर काहींनी जवळच्या घरांमध्ये धाव घेत स्वतःचा बचाव केला. या घटनेमध्ये २३ महिला, ३० पुरुष आणि १२ लहान मुलांसह एकूण ६५ हून अधिक जणांचा मधमाशांनी चावा घेतला आहे. मधमाध्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांवर राजगडमधील वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, पालखी सोहळ्यादरम्यान काही जणांनी फटाके वाजवल्याने मधमाशा भडकून हा हल्ला झाल्याचा प्राथमिक अंदाज स्थानिकांनी व्यक्त केला आहे.

## पुणे ड्रेनेज खर्चावर चौकशीची मागणी; ३००० कोटींचा हिशोब संशयाच्या भोवऱ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या ड्रेनेज विभागामार्फत गेल्या चार वर्षांत करण्यात आलेल्या हजारो कोटी रुपयांच्या खर्चाची सखोल चौकशी करण्यासाठी तातडीने नैमित्तिक समिती स्थापन करावी, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी महापौर मंजुषा नागपुरे यांच्याकडे केली आहे.

महापौरांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, प्रशासक काळात ड्रेनेज विभागाचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे साडेसातशे कोटी रुपये होते. त्यानुसार गेल्या चार वर्षांत जवळपास ३,००० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. याशिवाय 'जायका' प्रकल्पासाठी चालू वर्षाअखेर सुमारे ९०० कोटी रुपये खर्च झाले असून, सध्याच्या आर्थिक वर्षात इतर कामांमध्ये कपात करून २८९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राष्ट्रीय पूर नियंत्रण अभियानांतर्गत केंद्र सरकारकडून २८० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, त्यातील १२५ कोटी रुपये पूरप्रवण भागांसाठी खर्च करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, या निधीचा नेमका वापर कसा झाला, याबाबत स्पष्टता नसल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. गेल्या चार वर्षांत ड्रेनेज विभागाने सुमारे ४२ कोटी रुपयांचा खर्च केल्याची नोंदही त्यांनी केली आहे. मोठ्या प्रकल्पांसाठी सल्लागार नेमून त्यांना मोठ्या प्रमाणावर मानधन देण्यात आले, तसेच विविध कामांची बिले काढली असली, तरी प्रत्यक्ष कामांच्या गुणवत्तेबाबत शंका निर्माण होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. विशेषतः नव्याने समाविष्ट झालेल्या नऊ गावांमध्ये ड्रेनेज व्यवस्थेची अत्यंत वाईट स्थिती असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

## पुणे शिवसेनेच्या सर्व पदांना स्थगिती! नव्या कार्यकारिणीसाठी होणार मोर्चेबांधणी

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीत शिवसेनेचा पराभव झाला. ज्यांच्या नेतृत्वाखाली या निवडणुका पार पडल्या, त्यांची पदे काढून घेतलेली नाही. ते सर्वच माझ्याबरोबर व्यासपीठावर असून, आमच्यात गट-तट नाहीत. ज्याचे असतील त्यांनी गट- तट, मतभेद बाजूला ठेवून कामाला लागावे, असा सल्ला उद्योगमंत्री व शिवसेना नेते डॉ. उदय सामंत यांनी दिला.



येत्या महिन्याभरात पक्ष संघटना बांधणीवेळी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय दिसला नाही, तर स्वत: एकनाथ शिंदे त्यावर निर्णय घेतील, असा इशारा देत सामंत यांनी एक महिन्याचा अल्टिमेटमच दिला. पुण्यात शुक्रवारी (दि. ३) उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.

या वेळी शिवसेना नेत्या व विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, शहर प्रमुख प्रमोद भानगिरे, महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर, आबा बागुल, संजय भोसले, जिल्हाप्रमुख रमेश कोंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. पुणे शहर आणि जिल्हा स्तरावरील सहसंपर्कप्रमुख, महानगरप्रमुख आणि शहरप्रमुख ही तीन प्रमुख पदे सोडून त्याखालील सर्व पदांना स्थगिती दिली आहे. नवीन कार्यकारिणीचे आदेश एकनाथ शिंदे यांनी दिले असून, त्यानुसार पुढील महिन्याभरात प्रत्येक प्रभागात बैठका घेऊन वॉर्ड प्रमुखापासून उपशहर प्रमुखापर्यंतची ताकदीचे पदाधिकारी निवडण्यात येणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले.महायुतीत शिवसेनेच्या नेत्यांना टार्गेट केले जाते का, या प्रश्नावर बोलताना सामंत म्हणाले, की एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना स्वत:चे कर्तृत्व दाखवून दिले आहे. शिवसेना कोणत्याही टार्गेटला जुमानत नाही. अवकाळीमुळे शहरातील परिस्थितीवर धंगेकर काहीच बोलले नाहीत, यावर धंगेकर अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करतात. ते अभ्यास करून उद्या आवाज उठवतील, असे सामंत यांनी स्पष्ट केले. विधानपरिषद निवड आणि रोहित टिळक यांच्याबाबत विचारणा केली असता, माझ्या तब्येतीला झेपेल असेच प्रश्न विचारा, असे ते म्हणाले.

## न्याय द्या, नाहीतर जीव घ्या! ७५ वर्षांची आजी ७३ दिवसांपासून बसलीये उपोषणाला

**पुणे । प्रतिनिधी**

एक ७५ वर्षांची आजी गेल्या ७३ दिवसांपासून उपोषणाला बसली आहे. पण तिला कुणी दाद देण्यास तयार नाही. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील आळे येथे या आजीचे उपोषण सुरू आहे. आपल्या नातवाच्या हत्येप्रकरणी न्याय मिळावा आणि दोषींवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी ७५ वर्षीय लक्ष्मीबाई लक्ष्मण अल्हाट आणि त्यांचे पुत्र राजेंद्र अल्हाट गेल्या ७३ दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. मात्र, अडीच महिने उलटूनही एकाही जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्याने या आंदोलनकर्त्यांची साधी विचारपूसही केली नाही. असा गंभीर आरोप करण्यात येत आहे. या आंदोलनाची आता जिल्ह्यात चर्चा रंगली आहे.

साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय स्मारक समितीच्या वतीने हे आंदोलन सुरू आहे. स्मारकाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान अविनाश ललित आल्हाट यांचा खून झाला होता. या खुनाचा तपास पोलिसांनी सखोल करावा आणि रात्रीतून हटवलेला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा कोणी गायब केला, याची चौकशी व्हावी, अशी मागणी आंदोलकांनी



केली आहे. पुणे जिल्ह्यात सध्या कधी ऊन तर कधी अवकाळी पाऊस पडत आहे. अशा जीवघेण्या हवामानातही हे कुटुंब उघड्यावर बसून आहे. गेल्या काही दिवसांपासून पुण्यात कडाक्याचे ऊन आणि सोबतीला अवकाळी पाऊस अशा प्रतिकूल परिस्थितीतही ही वृद्ध माता आळे गावाजवळील माळरानावर आपल्या निर्णयावर ठाम आहे. ७३ दिवस उलटूनही शासन दरबारी या आंदोलनाची दखल घेतली जात नसल्याने स्थानिक स्तरावर संताप व्यक्त केला जात आहे. एकीकडे सरकार 'लाडकी बहीण' आणि 'ज्येष्ठ नागरिक' योजनांच्या जाहिराती करत असताना, दुसरीकडे पुण्याच्या जुन्नरमध्ये या आजीला आपल्या नातवाच्या खुन्यांना शिक्षा व्हावी म्हणून ७३ दिवस माळरानावर उपोषण करावं लागत आहे.लक्ष्मीबाई अल्हाट असं या माऊलीचं नाव असून, गेल्या अडीच महिन्यांपासून त्या आळे येथे न्यायाची वाट पाहत आहेत. धक्कादायक म्हणजे, अद्याप एकही अधिकारी या आंदोलनाकडे फिरकलेला नाही. राजेंद्र अल्हाट आणि त्यांच्या आईचे म्हणणे आहे की, स्मारकाच्या आंदोलनानंतर अविनाश आल्हाट यांचा खून झाला, पण पोलिसांकडून ठोस कारवाई होत नाही. त्यातच वस्तीतील अण्णा भाऊ साठे यांचा पुतळाही रात्रीतून गायब करण्यात आला. माझा नातू गेला, आता न्याय मिळाल्याशिवाय मी इथून हलणार नाही, असा टाहो ही आजी फोडत आहे.

## आरटीई लॉटरीची तारीख जाहीर; ६ एप्रिलला होणार सोडत

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यानुसार आर्थिक दुर्बल, तसेच आरक्षित प्रवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या आरटीई प्रवेश प्रक्रियेच्या लॉटरीची तारीख अखेर जाहीर करण्यात आली आहे. येत्या सोमवारी (दि. ६ एप्रिल २०२६) सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अर्थात विद्या प्राधिकरण येथे लॉटरीचे थेट प्रक्षेपण यू-ट्यूबद्वारे करण्यात असून, पालकांना याची लिंक उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यभरातील हजारो पालकांनी आपल्या मुलांच्या आरटीई प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज केले असून, या सर्व अर्जांमधून संगणकीय पद्धतीने पारदर्शक लॉटरी काढण्यात येणार आहे. लॉटरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी अधिकृत पोर्टलवर जाहीर केली जाणार आहे. शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, या प्रक्रियेत पूर्णपणे पारदर्शकता राखण्यासाठी डिजिटल प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप किंवा गैरप्रकार होण्याची शक्यता नाही. पालकांना त्यांच्या अर्जाची स्थिती ऑनलाइन पाहण्याची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना निश्चित कालावधीत आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रवेशप्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. वेळेत कागदपत्रे सादर न केल्यास पुढील प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी दिली जाईल. दरम्यान, पालकांनी अधिकृत संकेतस्थळावर लक्ष ठेवावे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे. यंदा राज्यातील आठ हजार ७०१ शाळांमध्ये १ लाख १४ हजार ८३३ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. यासाठी २ लाख ८८ हजारांहून अधिक अर्ज आले आहेत. गेल्यावर्षी या प्रवेशासाठी जवळपास तीन लाखांहून अधिक अर्ज आले होते. यंदा अर्जाच्या संख्येत काही प्रमाणात घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.